नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २४८ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## रस्त्यांचा ‘सरकारी खेळ’!

### हिंजवडी आयटी पार्कमधील नवीन उड्डाणपुलांसह भूसंपादन कोणी करायचे हेच ठरेना



**पुणे : (स. गांवकरी)**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील वाहतूककोंडीची समस्या सोडविण्यासाठी उड्डाणपुलांसह नवीन रस्त्यांचे नियोजन करण्यात आले. या प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी २०२४ मध्ये पावले उचलण्यात आली. मात्र, विविध सरकारी विभागांच्या चक्रात हे भूसंपादन अडकले असून, हे प्रकल्प अजूनही कागदावरच राहिले आहेत. आता हे भूसंपादन कोण करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या निमित्ताने आयटी पार्कमधील प्रकल्पांचा ‘सरकारी खेळ’ समोर आला आहे. आयटी पार्कमधील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली. मात्र, त्या तुलनेत रस्त्यांचे जाळे वाढले नाही. यामुळे वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट बनत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमध्ये उड्डाणपुलांसह नवीन रस्त्यांचे नियोजन केले. त्यात आयटी पार्कमधील सर्वाधिक कोंडीचे ठिकाण असलेल्या लक्ष्मी चौकात उड्डाणपूल आणि समतल विलगक बांधण्याचा प्रस्ताव आहे. याचबरोबर आयटी पार्क टप्पा एक ते तीनला जोडणाऱ्या माण रस्त्याचे सहापदरीकरण आणि उड्डाणपूल, शिवाजी चौक ते स्मशानभूमी सहापदरी रस्ता, बाणेर ते आयटी पार्क रस्ता या कामांचा समावेश आहे. या प्रकल्पांचे काम एमआयडीसीकडून केले जाणार होते. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाला या प्रकल्पासाठी भूसंपादन करण्यास सांगण्यात आले. नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने यास नकार देऊन एमआयडीसीनेच भूसंपादन करावे आणि प्रकल्पांचे कामही करावे, अशी सूचना केली. यावर उच्चस्तरीय पातळीवर चर्चा होऊन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावर (पीएमआरडीए) ही जबाबदारी सोपविण्यात आली. पीएमआरडीएने विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) देऊन हे भूसंपादन करावे, असा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर पुन्हा भूसंपादनाचा चेंडू एकमेकांकडे टोलविण्यात आला. आता सध्या या प्रकल्पासांठी भूसंपादन कोण करणार हेच निश्चित नसल्याचे समोर आले आहे. यासाठी प्रत्येक सरकारी विभाग एकमेकांकडे बोट दाखवित आहे. प्रकल्पांचे भूसंपादन एमआयडीसीनेच करावे, असा निर्णय गेल्या वर्षी झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. त्यानंतर एमआयडीसीकडून भूसंपादनासाठी पत्र आले होते.

#### उद्योगमंत्री सामंतही अनभिज्ञ

उद्योगमंत्री उदय सामंत हेही या भूसंपादनाच्या एकूण गोंधळाबाबत अनभिज्ञ आहेत. त्यांनी या प्रकल्पांचे भूसंपादन सार्वजनिक बांधकाम विभाग करेल, असे नुकतेच सांगितले. वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. विविध सरकारी विभागांमध्ये भूसंपादनाबाबत अनेक बैठका झाल्या आहेत. याबाबत सातत्याने पत्रव्यवहारही सुरू आहे. परंतु, वरिष्ठ पातळीवरून धोरणात्मक निर्णय होत नसल्याने या विभागांना निर्णय घेत नसल्याने धोरण लकवा निर्माण झाला आहे.

आयटी पार्कमधील उड्डाणपूल आणि रस्त्याच्या प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी अनेक बैठका झाल्या आहेत. त्यानुसार हे भूसंपादन पुणे पीएमआरडीए आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला लवकरात लवकर करण्याची विनंती करण्यात आली आहे. अद्याप यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

**– राजेंद्र तोतला, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

## तब्बल ६३ ‘स्टोन क्रेशर’ सील करत महसूल विभागाने दिला दणका

### प्रदूषण मंडळ व महावितरणलाही तपासणीचे आदेश

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

अहिल्यानगर तालुक्यातील तब्बल ६३ म्हणजे सर्वच खडीकरण केंद्रांना (स्टोन क्रशर – खाणपट्टे ) महसूल प्रशासनाने सील ठोकले आहे. खंडाळा, वारूळवाडी, कापूरवाडी, आरणगाव येथील हे स्टोन क्रशर आहेत. तहसीलदार मिलिंद कुलथे यांनी या कारवाईची माहिती दिली. याशिवाय या सर्व स्टोन क्रशरची प्रदूषण नियंत्रण मंडळ व महावितरणने स्वतंत्रपणे तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

महसूल विभागाच्या या कारवाईमुळे गौण खनिज माफीयांमध्ये मोठीच खळबळ उडाली आहे. या कारवाईपूर्वी स्टोन क्रशर चालकांना नोटीस बजावल्या गेल्या होत्या. स्टोन क्रेशरला सील करण्याची कारवाई एकाच टप्प्यात केली, काल, शुक्रवारी अखेरच्या स्टोन क्रेशरला सील करण्यात आले. या सर्व स्टोन क्रेशरनी आत्तापर्यंत केलेल्या उत्खननाची मोजणी व त्यासंदर्भात भरलेल्या रकमेचे चलन याचा ताळमेळ सादर करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. त्याची सुनावणी झाल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल, असे तहसीलदार कुलथे यांनी स्पष्ट केले. या स्टोन क्रेशरबद्दल तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, असेही त्यांनी




सांगितले. गौण खनिज उत्खननाबरोबरच प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच महावितरण यांनीही स्टोन क्रशरची तपासणी करावी असे आदेशही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संबंधित विभागाला दिलेले आहेत. पंधरा दिवसांपूर्वी आमदार अर्जुन खोतकर यांच्या अध्यक्षतेखालील १६ आमदारांच्या विधिमंडळ अंदाज समितीने नगर जिल्ह्यातील प्रकल्पांच्या कामाच्या तपासणीसाठी दौरा केला. या दौऱ्यामध्ये समितीकडे स्टोन क्रेशरबद्दल तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार समितीने अचानकपणे कापूरवाडी व वारुळवाडी येथील स्टोन क्रशरला भेटी दिल्या. या भेटीदरम्यानही नागरिकांनी समितीकडे बेकायदा गौण खनिज उत्खननाबद्दल तक्रारी केल्या. कापूरवाडी येथे एक संपूर्ण डोंगरच उत्खननात गायब झाल्याची तक्रार करण्यात आली होती. तालुक्यातील अनेक ठिकाणच्या स्टोन क्रशरवर पूर्वी दंडात्मक कारवाई झाली. मात्र त्याची वसुलीच झाली नाही. अशाही स्वरूपाची तक्रार होती.

## थोडक्यात...

### भारतावर साखर आयातीची नामुष्की

कोल्हापूर (स. गांवकरी) : साखर उत्पादनात जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश असणाऱ्या भारतावर यंदा साखर आयात करण्याची वेळ आली आहे. १० वर्षांच्या कालावधीनंतर भारताने १० लाख टन साखर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. देशातील साखर उत्पादनाचा चुकलेला अंदाज, इथेनॉल निर्मितीकडे ऊस वळवणे, साखर निर्यात कोट्यातील वाढ यामुळे साखर आयात करावी लागली. या निर्णयामुळे साखरेच्या दराचा वाढणारा आलेख नियंत्रणात राहून श्रावण, गणपती, दसरा-दिवाळी या सणासुदीच्या काळात साखरेचे दर नियंत्रित राहण्याचा अंदाज आहे. भारत हा ऊस उत्पादन आणि साखर निर्मितीतील जगात ब्राझीलनंतरचा दुसरा महत्त्वाचा देश आहे. ब्राझीलमध्ये ४२५ ते ४५० लाख टन साखर निर्मिती होत असली, तरी हा देश प्रामुख्याने साखर निर्यातीवर भर देतो. भारतात गेली काही वर्षे ३२० ते ३३० लाख टन साखर निर्मिती होत आहे. तर देशांतर्गत २८० ते २९० लाख टन साखरेचा वापर केला जातो. त्यातूनही भारत गेली नऊ वर्षे काही ना काही प्रमाणात साखर निर्यात करीत राहिला. परंतु, मागील हंगामात (२०२५-२६) इथेनॉल निर्मितीसाठी सुमारे ३० लाख टन इतकी साखर वळवली गेली होती. शिवाय मागील हंगामात भारताने प्रथम १० लाख टन, तर दोन महिन्यांपूर्वी ५ लाख टन साखर निर्यात परवानगी दिली होती.

### गुंतवणूक आणि रोजगार चालना

मुंबई (स. गांवकरी) : जर्मनीतील हेसन राज्य आणि महाराष्ट्र यांच्यातील भागीदारी ही दोन आर्थिक सक्षम राज्यांमधील सहकार्य आहे. या भागीदारीतून गुंतवणूक, नवोन्मेष, रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना मिळेल आणि नागरिकांसाठी नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र आणि हेसन मधील परस्पर सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत परस्पर सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर मुख्यमंत्री फडणवीस आणि हेसन राज्याचे अध्यक्ष बोरीस ऱ्हेइन यांनी स्वाक्षरी केली. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अनबलगन, कौशल्य विकास आयुक्त अमित सैनी यांच्यासह जर्मनीच्या हेसन राज्याचे शिष्टमंडळ उपस्थित होते. या करारामुळे हेसन हे महाराष्ट्रासाठी जर्मनी आणि युरोपमधील तर महाराष्ट्र हे हेसनसाठी भारत आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशातील प्रवेशद्वार ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विश्वास, ज्ञान, व्यापार, नवोन्मेष आणि लोकांमधील संबंधांच्या भक्कम पायावर भारत-जर्मनी भागीदारी उभी आहे. राष्ट्रीय स्तरावरील सहकार्याला आता राज्यस्तरावरील आर्थिक भागीदारीची जोड मिळत असून महाराष्ट्र आणि हेसन या दोन्ही राज्यांतील आर्थिक सामर्थ्य, औद्योगिक प्रगती आणि नवोन्मेष क्षमता यामुळे हे सहकार्य अधिक बळकट होणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

### केंद्र सरकारची परवानगी

मुंबई (स. गांवकरी) : सण, उत्सवाच्या काळात देशांतर्गत साखरेचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी आणि पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकारने १० लाख टन कच्च्या साखरेच्या आयातीला परवानगी दिली आहे. यासाठी साखर कारखाने आणि रिफायनरीकडून २१ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत.

## शिक्षक आणि कर्मचाऱ्यांसंदर्भात महाराष्ट्र शिक्षक परिषदेची महत्वाची मागणी

**अलिबाग : (स. गांवकरी)**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहिमेचे काम करणाऱ्या शिक्षक, शासकीय कर्मचारी, अंगणवाडी सेविका तसेच विविध विभागांतील कर्मचाऱ्यांना ४५ दिवसांची विशेष नैमित्तिक रजा आणि वाढीव मानधन देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने केली आहे. शिक्षक परिषदेचे संस्थापक आमदार संजय केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रवीण दरेकर यांना याबाबत निवेदन देण्यात आले. एसआयआर मोहिमेअंतर्गत कर्मचाऱ्यांना नियमित शासकीय कामकाजासोबत मतदारांची माहिती संकलित करणे, पडताळणी करणे, कागदपत्रांची तपासणी आणि माहिती अद्ययावत करण्याचे अतिरिक्त काम करावे लागले. ग्रामीण आणि दुर्गम भागात



प्रतिकूल हवामान, प्रवासाच्या अडचणी, इंटरनेट व तांत्रिक समस्या यांचा सामना करत अनेक कर्मचाऱ्यांनी सुट्टीच्या दिवशी आणि कार्यालयीन वेळेनंतरही हे काम पूर्ण केले. या अतिरिक्त कामामुळे कर्मचाऱ्यांवर मोठा कामाचा ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांच्या अतिरिक्त श्रमाची शासनाने दखल घेऊन ४५ दिवसांची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करावी तसेच मानधनात योग्य वाढ करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या मागणीबाबत सकारात्मकता दर्शवल्याचे शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी सांगितले.

## “फुले दाम्पत्याला ‘भारतरत्न’ मिळावा”, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भावना

**पुणे : (स. गांवकरी)**

‘फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळावा, ही महाराष्ट्राची भावना आहे. त्यांच्या महान कार्याचा योग्य सन्मान व्हावा, यासाठी विधानसभेने केंद्र सरकारकडे एकमताने शिफारस केली आहे,’ असे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर उभारण्यात आलेल्या ‘ज्ञानाई ज्ञानशिल्प’ या भित्तीचित्रांचे लोकार्पण पवार यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, सल्लागार समितीचे सदस्य राजेश पांडे उपस्थित होते. या वेळी शिल्पकार नवीन शेगंबर यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, ‘महिला विज्ञान, प्रशासन, संरक्षण, शेती, अंतराळ या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत, याच्या मुळाशी



सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष आहे. फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळावा, यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात आली आहे. नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांचे स्मारक आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ‘ज्योती-सावित्री’ अभ्यास शाळा उभारण्यात आली आहे.’

‘शिव-शाहू-फुले-आंबेडकर हा केवळ इतिहास नाही, तर तो महाराष्ट्राचा आत्मा आहे. आपल्या वर्तमानाचा पाया आहे. हा वारसा अजितदादांनी आपल्या कारकिर्दीत जपला. पुण्यातील ऐतिहासिक भिडेवाड्यात फुले दाम्पत्याचे राष्ट्रीय स्मारक उभे राहावे, यासाठी दादांनी पाठपुरावा केला आणि विशेष निधी दिला,’ असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

“लेक लाडकी’, ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’, मोफत उच्च शिक्षण याद्वारे राज्य सरकार महिलांना सक्षम करत आहे. महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख देणारे ‘महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी सक्षमीकरण’ धोरण हा क्रांतिकारी निर्णय आहे,’ असेही त्या म्हणाल्या.

#### ‘सावित्रीची लेक असल्याचा अभिमान’

‘मराठवाड्यातील एका छोट्या गावात, शेतकरी कुटुंबात जन्मलेली मुलगी आज राज्याची पहिली महिला उपमुख्यमंत्री होऊ शकली, याचे श्रेय सावित्रीबाईंनी पेटवलेल्या ज्ञानज्योतीचेच आहे,’ अशी भावना सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली.

#### ‘३० मिनिटांत परवानग्या’

‘विद्यापीठात सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारण्यास आठ वर्षे लागली. त्यासाठी २४ परवानग्या लागणार होत्या. या परवानग्या मिळवण्यासाठी दोन वर्षे लागतील, असे वाटत होते. मात्र, तत्कालीन पालकमंत्री असलेल्या अजित पवार यांनी त्या ३० मिनिटांत मिळवून दिल्या. छगन भुजबळ यांनीही स्मारकासाठी पाठपुरावा केला,’ अशी माहिती राजेश पांडे यांनी दिली.

## डोंगरावरून उडी मारून तरुणाने जीवन संपवलं

**(स. गांवकरी)**

वाळूज औद्योगिक वसाहत परिसरातील तिसगावजवळील खवड्या डोंगरावरून एका तरुणाने उडी घेतली, त्याला वाचवताना वडिलांचाही तोल गेला आणि त्यांना डोंगरावरून कोसळताना पाहून आईने पाठोपाठ उडी घेतली. तिघेही उंच कड्यावरून खोल खाणीमध्ये पडले. खडकावर आदळून त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी १ च्या सुमारास घडली. दरम्यान, या घटनेमागची खरी कहाणी आता समोर आली आहे. एनडीटीव्हीने यासंदर्भातील सविस्तर वृत्त दिलं आहे. कुणाल (वय १८) असं आत्महत्या केलेल्या तरुणाचं नाव असून त्याने कसातरी आयफोन विकत घेतला होता, परंतु त्याला त्याचे हप्ते भरणे परवडत नव्हते. हाच या मुलाचा त्याच्या कुटुंबासोबत झालेल्या वादाचा मुख्य मुद्दा ठरला, ज्याचं पर्यावसान शेवटी एका मोठ्या दुर्घटनेत झालं, अशी माहिती महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी शुक्रवारी दिली. मोबाईलचे कॅमेरे सुरू असतानाच कुणाल आणि त्याचे वडील दरीमध्ये कोसळले आणि त्यानंतर पाठोपाठ त्याच्या आईनेही कड्यावरून खाली उडी घेतली. “तुझ्या आईसाठी तरी



जग”, असं एका माणसाने कुणालला सांगितलं, जेव्हा तो कड्यावरून उडी मारण्याची धमकी देत होता. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यावर कुणालने उत्तर दिलं, “नाही, मला मरावंच लागेल. हाच एकमेव मार्ग उरला आहे.” यानंतर काही वेळातच, त्याचे वडील मुरलीधर चांदगुडे यांनी त्याला समजावण्याचा आणि मागे ओढण्याचा प्रयत्न केला, परंतु दोघेही खाली कोसळले; त्यानंतर आई संगीता यांनीही त्यांच्यापाठोपाठ उडी घेतली.

तिसगाव गावचे माजी सरपंच संजय जाधव हे कुणालची समजूत काढण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपैकी एक होते. इतरांनी त्याला ‘आयफोन १५ प्रो’ घेऊन देण्याचे आश्वासनही दिलं. “आम्ही त्याला खूप विनवण्या केल्या की त्याने त्याच्या आईकडे पाहावं, त्याने उडी मारू नये, तो सुशिक्षित आहे आणि त्याचं भविष्य पुढे आहे. आम्ही शक्य ते सर्व प्रयत्न केले”, असं जाधव म्हणाले. या संपूर्ण गोंधळादरम्यान कुणाल फक्त खांदे उडवून, ‘मरण हाच माझा एकमेव मार्ग आहे’ यावर ठाम राहिला. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कुणालने एक आयफोन खरेदी केला होता आणि तो हप्ते भरण्यासाठी त्याच्या कुटुंबाकडे पैशांची मागणी करत होता. यावरून त्याचे वडिलांशी वाद झाले. या वादाच्या रागातून कुणालने सकाळी १० च्या सुमारास घर सोडलं आणि वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तिसगाव परिसरातील एका टेकडीवर तो चढला. त्याचे आई-वडील आणि इतर स्थानिक नागरिक तेथे पोहोचले आणि त्यांनी जवळपास तीन तास त्याला खाली उतरवण्याचा प्रयत्न केला. घटनास्थळी पोलीस आणि अग्निशामक दलाचे जवान हजर असतानाही तेथे सुरक्षा जाळे का उभारले गेले नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास, म्हणजेच हा प्रकार सुरू झाल्यानंतर साधारण तीन तासांनी, कुणालचे वडील तो उभा असलेल्या ठिकाणी चढले आणि त्यांनी त्याला कड्यावरून मागे ओढण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात वडील आणि मुलगा दोघांचाही तोल गेला आणि ते खाली खोल दरीमध्ये कोसळले. पती आणि मुलाला डोळ्यांदेखत कोसळताना पाहून, संगीता यांनीही काही क्षणांतच टेकडीवरून खाली उडी घेतली. तिघांचाही जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी तिन्ही मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याचं अधिकाऱ्यांनी

## २० वर्षे तुरुंगात घालवल्यानंतर तो लॅपटॉप हाती घेऊन बाहेर पडला

**मुंबई : (स. गांवकरी)**

अनेक वर्षे तुरुंगवासाची शिक्षा भोगल्यानंतर समाजात पुन्हा नव्याने उभे राहणे ही कैद्यांसाठी मोठी कसोटी असते. अशा व्यक्तींना स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य शासनाकडून दिल्या जाणाऱ्या एकरकमी पुनर्वसन अनुदानात दुपटीने वाढ करण्यात आली आहे. १९९३ मध्ये केवळ १,००० रुपयांपासून सुरू झालेले हे साहाय्य आता ५०,००० रुपयांवर पोहोचले आहे. किमान एक वर्ष कोठडीत राहून निर्दोष सुटलेल्या व्यक्तींचाही यात प्रथमच समावेश करण्यात आला आहे.

कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहातून २०२२ मध्ये एका ४४ वर्षीय व्यक्तीची तब्बल दोन दशकांच्या तुरुंगवासानंतर सुटका झाली. हत्येच्या गुन्ह्यात जन्मठेप भोगत असताना त्याने इतिहास आणि समाजशास्त्र या विषयात पदव्युत्तर पदवी (एमए) मिळवली, तसेच कायद्याचे शिक्षण घेण्याचा निश्चय केला. शिक्षणासाठी लॅपटॉपची गरज होती; मात्र आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. राज्य सरकारच्या योजनेतून मिळालेल्या २५ हजार रुपयांच्या अनुदानात स्वतःकडील ५ हजार रुपये जोडून त्याने जुना लॅपटॉप विकत घेतला. आज ही व्यक्ती मुंबईतील



शिक्षा भोगलेल्या कैद्यांना मिळतोय सरकारच्या ‘या’ योजनेचा लाभ

एका खासगी कायदेविषयक सल्लागार संस्थेत कायदेशीर साहाय्यक (लीगल असिस्टंट) म्हणून कार्यरत आहे.

महिला व बालविकास विभागाने १८ ऑगस्ट रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार अनुदानात २५ हजारांवरून थेट ५० हजार रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. १४ जुलै रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी मिळाली होती. नव्या नियमांनुसार, ‘महाराष्ट्र गुन्हेगार परिवीक्षा अधिनियम, १९५८’ अंतर्गत पात्र व्यक्तींबरोबरच, किमान एक वर्ष न्यायालयीन कोठडी भोगून निर्दोष सुटलेल्या व्यक्तींनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे. १८ ऑगस्ट रोजी किंवा त्यानंतर सुटका झालेल्यांना ही वाढीव रक्कम लागू असेल.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नाशिक कुंभनगरीतील निमाणी बसस्थानकाची दयनीय अवस्था

नाशिक (स. गांवकरी) : नाशिक स्मार्ट सिटी आणि आगामी कुंभनगरीच्या पार्श्वभूमीवर शहरातील पायाभूत सुविधांकडे विशेष लक्ष दिले जात असताना, निमाणी बसस्थानकाची मात्र अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. बसस्थानकातील प्रवाशांसाठी असलेल्या शेडची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली असून, पावसाळ्यात प्रवाशांना बसण्यासाठी किंवा थांबण्यासाठी पुरेशी सुरक्षित जागा उपलब्ध नसल्याने त्यांना अक्षरशः पावसात उभे राहावे लागत आहे. निमाणी बसस्थानकातून धुळे, नंदुरबार, शहादा, साक्री, दोंडाईचा यांसह विविध लांब पल्ल्यांच्या बसफेऱ्या सुरू असतात. या बससेवांचा दररोज मोठ्या संख्येने प्रवासी लाभ घेतात. अनेक वेळा प्रवाशांना बसची तासनतास प्रतीक्षा करावी लागते. मात्र, बसस्थानकातील शेडची दुरवस्था आणि सततच्या पावसामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. त्यातच बसस्थानकाच्या परिसरात मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवाशांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. एकीकडे नाशिक शहरात विविध विकासकामे आणि रस्त्यांची कामे सुरू असून, नाशिकला स्मार्ट सिटी आणि कुंभनगरी म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दुसरीकडे सार्वजनिक वाहतुकीच्या महत्त्वाच्या केंद्राची अशी अवस्था असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शासनाने प्रवास भाड्यात वाढ करून उत्पन्न वाढविले असताना प्रवाशांना मात्र मूलभूत सुविधा मिळत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. संबंधित प्रशासनाने निमाणी बसस्थानकातील तुटलेले शेड तातडीने दुरुस्त करावे, खड्डे बुजवावेत आणि प्रवाशांसाठी सुरक्षित व पुरेशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

### टोरंट पॉवरचा खर्डी गावात ग्राहक संवाद मेळावा



■ ३५० नवीन वीज मीटर कार्यान्वित व शंका निरसन

ठाणे (स. गांवकरी) : टोरंट पॉवर लिमिटेडच्या (TPL) वतीने दिवा प्रभागातील खर्डी गावात स्थानिक नागरिकांसाठी एका विशेष संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. हा मेळावा स्थानिक नगरसेवक बाबाजी पाटील आणि नगरसेविका अर्चना पाटील यांच्या सहकार्याने पार पडला. सदर उपक्रमामुळे खर्डी गावातील ३५० नवीन वीज मीटर कार्यान्वित झाले असून सर्व ग्रामस्थांना अधिकृत वीज पुरवठ्याशी जोडण्यात आले आहे. प्रसंगी मेळाव्यात टोरंट पॉवरच्या अधिकाऱ्यांनी वीज दर (टॅरिफ), बिलिंग सायकल, अचूक मीटर रीडिंग तसेच घरगुती विद्युत उपकरणांचा सुरक्षित आणि कार्यक्षम वापर याविषयी ग्रामस्थांना सविस्तर माहिती दिली. उपस्थित नागरिकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे आणि शंकांचे अधिकाऱ्यांनी थेट जागेवरच समाधानकारक निरसन केले. या कार्यक्रमास नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील यांच्यासह टोरंट पॉवरचे एजीएम प्रकाश चंदन, जनसंपर्क व्यवस्थापक शशिकांत, राहुल आमडे, नागेश आणि बहुसंख्य खर्डी ग्रामस्थ उपस्थित होते.



### श्रावणानिमित्त १२ ज्योतिर्लिंग रुद्राभिषेक भक्तिमय वातावरणात संपन्न!

मुलुंड (स. गांवकरी) : श्री महालक्ष्मी महिला ग्रुप, श्री धनलक्ष्मीबेन महिला चॅरिटेबल ट्रस्ट आणि एकता सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्रावण मासानिमित्त मुलुंड येथील क्रिस्टल हॉल येथे १८ ऑगस्ट २०२६ रोजी १२ ज्योतिर्लिंग रुद्राभिषेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्वान शास्त्रीजी व ब्राह्मणांच्या मंत्रोच्चारात वेदोक्त पद्धतीने १२ ज्योतिर्लिंगांचा विधिवत रुद्राभिषेक करण्यात आला. कार्यक्रमास नानजीभाई खीमजीभाई ठक्कर, राजेशभाई अनम, राजेंद्र पांडे, नीताबेन जोशी यांच्यासह महिला मंडळातील अनेक भगिनी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व भाविकांसाठी फराळी नाश्ता व प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय व मंगलमय वातावरण निर्माण झाले. यावेळी नीताबेन यांच्या हस्ते नानजीभाई ठक्कर व राजेशभाई अनम यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या सहकार्याबद्दल व सेवाभावाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. नानजीभाई ठक्कर यांनी श्रावण महिन्यात भगवान महादेवाची भक्ती व रुद्राभिषेकाचे विशेष महत्त्व असल्याचे सांगितले. अशा धार्मिक व सेवाभावी उपक्रमांतून समाजात एकता, भक्ती व सेवाभाव वाढावा, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शास्त्रीजी, ब्राह्मण, मान्यवर, महिला भगिनी, कार्यकर्ते व भाविकांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले.



### राष्ट्रवादी काँग्रेसच्या भटके विमुक्त सेलच्या नाशिक जिल्हाध्यक्षपदी अजित शिंदे

नाशिक (स. गांवकरी) : राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) पार्टीच्या भटके विमुक्त (VJNT) सेल)च्या नाशिक जिल्हा अध्यक्षपदी अजित शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस (भटके विमुक्त सेल) चे प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड यांच्या आदेशाने नुकतीच ही निवड करण्यात आली. निफाड तालुक्यातील सारोळे (क) पो. कनसगाव येथील श्री. अजित भास्करराव शिंदे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत प्रदेश उपाध्यक्ष अंबादास बनकर यांच्या शिफारशी नुसार श्री अजित शिंदे यांची निवड करण्यात आली त्यांना मुंबई येथे नियुक्तीपत्र देण्यात आले यावेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड प्रदेश उपाध्यक्ष अंबादास धनगर, करण सिंग बावरी आणि एडवोकेट साहेब माजी न्यायाधीश एडवोकेट संजय जोरे आदी यावेळी उपस्थित होते.

# मयत कर्जदाराच्या वारसास विमा धनादेश वितरण

## अपघाती विमा योजनेतून ₹२ लाख ६६ हजार ४१२ रुपयांचा दावा मंजूर

नेवासा : (स. गांवकरी)



सहकाराची समृद्ध परंपरा जपत आर्थिक सेवांसोबत सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या बुलडाणा अर्बन संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर विभागातील नेवासा शाखेच्या वतीने मयत कर्जदार सभासदाच्या वारसास अपघाती विमा योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या रकमेचा धनादेश व सोनेतारण कर्ज खात्यातील तारण सोने परत करण्यात आले.

नेवासा शाखेच्या कार्यक्षेत्रातील उस्थळ दुमाला येथील रहिवासी आणि संस्थेचे सभासद स्व. विलास बाबुराव धोत्रे यांनी २५ एप्रिल २०२५ रोजी नेवासा शाखेतून २ लाख ३५ हजार रुपयांचे सोनेतारण कर्ज घेतले होते. दरम्यान, २४ मार्च २०२६ रोजी त्यांचा अपघाती मृत्यू झाला.

बुलडाणा अर्बन संस्थेच्या वतीने ठेवीदारांना त्यांच्या ठेवीच्या रकमेइतके, तर कर्जदारांना कर्जाच्या रकमेइतके अपघाती विमा संरक्षण देण्यात येते. धोत्रे यांच्या अपघाती निधनाची माहिती मिळताच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक (भाईजी), अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर आणि सरव्यवस्थापक कैलासजी कासट यांच्या आदेशानुसार तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय व्यवस्थापक रमेश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा शाखेचे व्यवस्थापक ईश्वर मुरलीधर काकडे यांनी धोत्रे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करून संस्थेच्या अपघाती विमा योजनेची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर धोत्रे कुटुंबीयांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून विमा प्रस्ताव संस्थेच्या मुख्यालयाकडे पाठविण्यात आला. या योजनेअंतर्गत आयसीआयसीआय लोम्बार्ड कंपनीने स्व. विलास बाबुराव धोत्रे यांच्या कर्जाच्या व्याजासह संपूर्ण थकीत रकमेचा २ लाख ६६ हजार ४१२ रुपयांचा विमा दावा मंजूर केला.

२१ ऑगस्ट २०२६ रोजी मयत सभासदाच्या वारसदार सौ. ज्योती विलास धोत्रे यांना मंजूर विमा रकमेचा धनादेश तसेच सोनेतारण कर्ज खात्यातील तारण सोने परत करण्यात आले.

हा कार्यक्रम उस्थळ दुमाला येथील सरपंच राजेंद्र उंदरे, सामाजिक कार्यकर्ते व संस्थेचे सभासद किशोर भाऊ भणगे, नेवासा येथील प्रतिष्ठित व्यापारी अजित शेठ ठोळे, पत्रकार बाळासाहेब पिसाळ आणि सोनू पिटेकर यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी नेवासा शाखेचे शाखा व्यवस्थापक ईश्वर काकडे तसेच शाखेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते. आर्थिक व्यवहारांसोबतच सभासदांच्या कुटुंबीयांच्या अडचणीच्या काळात त्यांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या अशा सामाजिक उपक्रमांमुळे सहकार क्षेत्रातील संस्थांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडत आहे.



## कल्याण नायब तहसीलदारांना जुन्नर तालुका घटनेच्या निषेधार्त निवेदन

ठाणे, कल्याण : (स. गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी गावात अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व निर्घृण हत्या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा देऊन पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते विशाल शांताराम कुरकुटे यांनी कल्याणचे निवासी नायब तहसीलदार सत्यजित चव्हाण यांना निवेदन सादर केले. या निवेदनात संबंधित प्रकरणाची जलदगती न्यायालयात सुनावणी करून आरोपीला कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच पीडित कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत, कायदेशीर सहाय्य व आवश्यक संरक्षण उपलब्ध करून देण्यात यावे अशीही मागणी करण्यात आली. राज्यभर अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे, महिलांवरील व बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी कठोर अंमलबजावणी करणे आणि जनजागृती मोहीम हाती घेण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली. प्रसंगी निवासी नायब तहसीलदार सत्यजित चव्हाण यांनी सदर निवेदन पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविण्यात येईल असे आश्वासन दिल्याची माहिती विशाल कुरकुटे यांनी दिली.

## सायबर फसवणुकीतील ५० हजारांची संपूर्ण रक्कम आठ दिवसांत परत

*येरवडा पोलिसांच्या सायबर पथकाची उल्लेखनीय कामगिरी; प्रभावी पाठपुराव्याने नागरिकाला दिलासा*



पुणे : (स. गांवकरी)

मोबाईलवर आलेल्या अद्ययावत संदेशाच्या माध्यमातून मोबाईल हॅक करून एका नागरिकाची तब्बल ५० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली होती. या प्रकरणात येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाने तत्परतेने कार्यवाही करत बँक व संबंधित व्यापाऱ्यांशी प्रभावी पत्रव्यवहार आणि दूरध्वनीद्वारे संपर्क साधत सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश मिळाले असून, फसवणूक झालेली संपूर्ण ५० हजार रुपयांची रक्कम अवघ्या आठ दिवसांत नागरिकाला परत मिळवून देण्यात आली आहे. येरवडा, पुणे येथील रहिवासी ताजुद्दीन बारभुईया यांना मोबाईल अद्ययावत करण्यासंदर्भातील संदेश प्राप्त झाला होता. त्यानंतर त्यांच्या मोबाईलशी संबंधित फसवणूक होऊन त्यांच्या खात्यातून ५० हजार रुपये परस्पर काढण्यात आले. याबाबत त्यांनी येरवडा पोलीस ठाण्यातील सायबर पथकाकडे तक्रार अर्ज दाखल केला. या प्रकरणाची नोंद सायबर अर्ज क्रमांक 31908260172461/2026 अशी करण्यात आली.

तक्रार प्राप्त होताच येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाने प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली. फसवणुकीची रक्कम ज्या माध्यमातून हस्तांतरित झाली, त्या संबंधित बँक व व्यापाऱ्यांशी तातडीने संपर्क साधण्यात आला. तसेच आवश्यक कागदपत्रे, पुरावे आणि पाठपुरावा करून फसवणुकीची रक्कम परत मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

पोलिसांच्या या तत्पर आणि सातत्यपूर्ण कार्यवाहीमुळे ५० हजार रुपयांची संपूर्ण रक्कम आठ दिवसांच्या कालावधीत परत मिळविण्यात यश आले. त्यामुळे सायबर फसवणुकीला बळी पडलेल्या नागरिकाला मोठा दिलासा मिळाला आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग मनोज पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-४ चिलुमुला रजनिकांत आणि सहायक पोलीस आयुक्त, येरवडा विभाग सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन

दरम्यान, मोबाईल अद्ययावत करणे, बँक खाते बंद होणे, केवायसी पूर्ण करणे अथवा अन्य कोणत्याही कारणाने आलेल्या संशयास्पद संदेशांमधील संकेतस्थळे किंवा दुवे उघडू नयेत. अनोळखी व्यक्तींना बँक खात्याची माहिती, संकेतांक किंवा इतर गोपनीय माहिती देऊ नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. सायबर फसवणूक झाल्यास विलंब न करता तातडीने पोलिसांशी संपर्क साधल्यास फसवणुकीची रक्कम परत मिळविण्याची शक्यता वाढते, हे या प्रकरणातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## ओतूर पोलिसांची मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध कारवाई

ओतूर : (स. गांवकरी)

### तीन आरोपींना न्यायालयाकडून दंड



ओतूर पोलीस स्टेशन हद्दीत वाहतूक नियमांचे उल्लंघन करून मद्यप्राशनाच्या अवस्थेत वाहन चालविणाऱ्या इसमांविरुद्ध ओतूर पोलिसांकडून प्रभावी कायदेशीर कारवाई करण्यात आली. सदर कारवाईमध्ये मोटार वाहन अधिनियम कलम 185 अन्वये दाखल तीन प्रकरणांमध्ये आरोपींनी मा. न्यायालयात गुन्ह्याची कबुली दिल्याने न्यायालयाने प्रत्येकी रु. 10,000/- द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली आहे.

1) गुन्हा रजि. नं. 209/2026, मोटार वाहन अधिनियम कलम 185

आरोपी अनिल नामदेव नलावडे, वय 48 वर्षे, रा. धोलवड, ता. जुन्नर, जि. पुणे याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. सदर प्रकरणाचा संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 570/2026 असून, मा. जे.एम.एफ.सी. न्यायालय, जुन्नर येथे सुनावणी झाली. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याने मा. न्यायालयाने त्यास रु. 10,000/- द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली.

2) गुन्हा रजि. नं. 212/2026, मोटार वाहन अधिनियम कलम 185

आरोपी अनिकेत सोमनाथ डोके, वय 21 वर्षे, रा. हापुसबाग, ता. जुन्नर, जि. पुणे याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. सदर प्रकरणाचा संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 569/2026 असून, मा. जे.एम.एफ.सी. न्यायालय, जुन्नर येथे सुनावणी झाली. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याने मा. न्यायालयाने त्यास रु. 10,000/- द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली.

3) गुन्हा रजि. नं. 217/2026, भा. न्या.सं.का.क. कलम 185

आरोपी सुशांत दिलीप ठिकेकर, वय 38 वर्षे, रा. ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. सदर प्रकरणाचा समरी क्रिमिनल केस नं. 576/2026 असून, मा. जे.एम.एफ.सी. न्यायालय, जुन्नर येथे सुनावणी झाली.

आरोपीने मा. न्यायालयात सदर गुन्ह्याची कबुली दिल्याने मा. न्यायालयाने त्यास रु. 10,000/- द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली आहे.

सदर तीनही प्रकरणांमध्ये पोलीस अधिक्षक मा. संदिपसिंह गिल्ल सो , अप्पर पोलीस अधिक्षक डॉ.शुभमकुमार सो, उपविभागीय पोलीस अधिकारी धंनजय पाटील सो यांचे सुचनेसुमार व मार्गदर्शनाखील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. डी. बी. बाजगिरे, प्रभारी अधिकारी, ओतूर पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. प्रकरणांचा तपास पोलीस हवालदार बांबळे, ओतूर पोलीस स्टेशन यांनी केला. न्यायालयीन कामकाजासाठी पोलीस कॉन्स्टेबल ए. एम. भेके,कोर्ट भैरवी अधिकारी महिला पोलीस हवालदार ताम्हणे, पोशि बर्डे , पोशि जायभाये यांनी कारवाई केली आहे. ओतूर पोलीस स्टेशनतर्फे वाहनचालकांनी मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे व स्वतःसह इतरांच्या जीविताची सुरक्षितता राखावी, असे आवाहन ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्याकडून करण्यात येत आहे.

## अकुलवार यांच्यावर फौजदारी कारवाई झाल्याशिवाय गप्प बसणार नाही!

सोलापूर : (स. गांवकरी)



■ दीड कोटी रुपये महापालिकेच्या तिजोरीत जमा करण्याची नगरसेवक अनंत जाधव यांची ठाम मागणी

सोलापूर महानगरपालिकेच्या माजी नगर अभियंता सारिका अकुलवार यांच्याशी संबंधित कथित आर्थिक अनियमिततेच्या प्रकरणावरून आता नगरसेवक अनंत जाधव यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोष सिद्ध झाल्यास संबंधितां विरोधात फौजदारी कारवाई करावी, अशी ठाम मागणी जाधव यांनी केली आहे. महापालिकेच्या निधीचा गैरवापर किंवा आर्थिक नुकसान झाले असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करून दीड कोटी रुपये महापालिकेच्या तिजोरीत जमा झाले पाहिजेत, अशीही त्यांची मागणी आहे. “फौजदारी कारवाई झाल्याशिवाय आणि महापालिकेच्या पैशांची वसुली झाल्याशिवाय गप्प बसणार नाही,” अशी भूमिका नगरसेवक अनंत जाधव यांनी घेतली आहे. महापालिकेच्या पैशांचा प्रत्येक रुपया हा जनतेच्या करातून जमा झालेला असतो. त्यामुळे आर्थिक अनियमिततेचे आरोप सिद्ध झाले आहेत त्यावरून जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर असल्याने फौजदारी कारवाई आणि नुकसान भरपाईची वसुली झाली पाहिजे, अशी मागणी पुढे आली आहे. आता प्रशासन या प्रकरणात नेमकी कोणती भूमिका घेते, चौकशीचा निष्कर्ष काय येतो आणि महापालिकेच्या तिजोरीत दीड कोटी रुपये परत जमा होणार का, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

# श्री वेंकटेश्वर देवस्थान मंदिर यात्रा मोठ्या उत्साहात भक्ती भावाने संपन्न

अक्कलकोट : (स. गांवकरी)





अक्कलकोट येथील नामधारी क्षत्रिय गवंडी समाजच्या वतीने शहरातील बुधवार पेठ येथील गवंडी समाजाच्या श्री वेंकटेश्वर देवस्थानच्या ८५ व्या वर्धापन दिनानिमित्त श्रींचा उत्सव मोठ्या श्रद्धेने व भक्ती भावाने साजरा करण्यात आला. आज गुरूवार दिनांक २० ऑगस्ट मिथी श्रावण शु ८, उत्सव रोजी पहाटे ५ वाजता पारंपरिक पद्धतीने देवस्थानचे पुजारी पवन देसाई यांनी काकडआरती केली. सकाळी ६ ते ७ या वेळेत पारंपरिक पद्धतीने श्रीना तुपाचे अभिषेक करण्यात आले. तदनंतर सकाळी ७ वाजल्यापासून दिवसभर भाविकांना मंदिर खुले करण्यात आले. उत्सवानिमित्त मराठवाड्यातील उस्मानाबाद येथून भजन व दिंडी मंडळांना आमंत्रित करण्यात आले होते. सकाळी १० वाजता श्रींची सजविलेल्या पालखीचे पूजन माजी नगराध्यक्ष व अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी व युवा नेते प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते संपन्न होऊन श्रींची आरती करून पालखी मिरवणुकीचे शुभारंभ करण्यात आले. या पालखी मिरवणुकीत वाजंत्री, भजन, दिंडी इत्यादींचा सहभाग होता. पालखी मिरवणुकीचे प्रस्थान सकाळी १० वाजता बुधवार पेठ येथील मंदिरातून निघून कारंजा चौक, मौलाली गल्ली, आझाद गल्ली, डबरे गल्ली, देशमुख गल्ली, नवश्या मारुती मार्गे मेन रोड, फत्तेसिंह चौक, सेंट्रल चौक, कापड बाजार, कारंजा चौक, विजय चौक, बस स्टॅन्ड समोरून हसापुर रोड, खासबाग, हन्नूर चौक, बुधवार पेठ येथील मंदिरात दुपारी १ : ३० वाजता पालखीचे आगमन होऊन मंदिरास पालखी प्रदक्षिणा करून पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

या पालखी सोहळ्यास शहरातील हजारो भाविक व समाज बांधव उपस्थित राहून श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला. तत्पूर्वी पालखी पूजनास व आरतीस उपस्थित असलेले माजी नगराध्यक्ष व अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी व युवा नेते प्रथमेश इंगळे आदि मान्यवरांचा सत्कार देवस्थानचे अध्यक्ष चंद्रकांत गवंडी व सचिव अप्पाशा गवंडी, विश्वस्त श्रीशैल गवंडी, श्रीमंत चेंडके यांचे हस्ते करण्यात आला. दुपारी २ वाजता सर्व भाविकांसह सेवेकरी, भजनकरी यांना देवस्थानच्या वतीने भोजन महाप्रसाद देण्यात आले. हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी व्यंकटेश्वर देवस्थानचे अध्यक्ष चंद्रकांत गवंडी, सचिव अप्पाशा गवंडी, विश्वस्त श्रीमंत गवंडी, श्रीमंत चेंडके, श्रीशैल गवंडी, अशोक गवंडी, सुनील गवंडी, गोकुळ गवंडी, आदींसह सर्व समाज बांधव व भाविक भक्त उपस्थित होते.

उत्सवातील सर्व कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली अमोल गवंडी, राकेश गवंडी, राहुल गवंडी, राजेंद्र गवंडी, सन्मुख गवंडी, हेमंत गवंडी, वेंकटेश गवंडी , गोकुळ गवंडी, देविदास गोबरे, मल्लिकार्जुन गवंडी, डॉ.मल्लिनाथ गवंडी, वेंकट राजापुरे, श्रीशैल राजापुरे, कुमार गवंडी, दौलप्पा गवंडी, यलप्पा गवंडी, काशीनाथ गवंडी आदींसह इतर समाज बांधवानी परिश्रम घेतले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## गावठी कट्टा बाळगणारा तरुण रावेर पोलिसांच्या जाळ्यात

रावेर (स. गांवकरी) : रावेर शहरातील बसस्थानकाच्या मागील परिसरात गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या एका तरुणाला रावेर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने अटक केली. ही कारवाई गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी करण्यात आली. पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, रावेर बसस्थानकाच्या मागे छोरीया मार्केटजवळ एक इसम शस्त्र बाळगून संशयास्पदरीत्या फिरत आहे. या माहितीची खातरजमा करण्यासाठी गुन्हे शोध पथक परिसरात गेले असता छोरीया मार्केटकडे जाणाऱ्या रस्त्यावर राखाडी रंगाचा फुलबाह्यांचा शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पँट परिधान केलेला तरुण पोलिसांच्या निदर्शनास आला. पोलिस पथकाला पाहून त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याला थांबवून पंचांसमक्ष अंगझडती घेण्यात आली. यावेळी त्याच्याकडून अंदाजे २५ हजार रुपये किमतीचा देशी बनावटीचा लोखंडी धातूचा गावठी कट्टा तसेच एक हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव कृष्णा दत्तू पाटील (वय २०, रा. रोकडा हनुमान मंदिर नगर, रावेर) असे सांगितले. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल सुकेश तडवी यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली असून रावेर पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३९८/२०२६, भारतीय हत्यार कायदा कलम ३ सह २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर शस्त्र आरोपीने कोठून मिळविले, कोणत्या उद्देशाने खरेदी केले तसेच या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. ही कारवाई मा. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक संदीप गावीत तसेच फैजपूर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली रावेर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप पाटील, सहायक पोलिस निरीक्षक हरिदास बोचरे आणि गुन्हे शोध पथकातील पोलिस हेड कॉन्स्टेबल समाधान ठाकूर, पोलिस कॉन्स्टेबल सुकेश तडवी, श्रीकांत चव्हाण, विकार शेख, प्रमोद पाटील, विशाल पाटील व संभाजी बिजागरे यांनी केली.

## रक्षाबंधना आधीच तुटला प्रेमाचा धागा; विरहाने बहिणीनेही सोडले प्राण





अर्धापूर (स. गांवकरी) : तुझं-माझं जमेना आणि तुझ्यावाचून करमेना... बहीण-भावाच्या अतूट प्रेमाची साक्ष देणारी ही उक्ती अर्धापूर तालुक्यात एका अत्यंत हृदयद्रावक घटनेने सिद्ध झाली आहे. भावाच्या निधनाची वार्ता ऐकून बहिणीनेही काही तासांतच प्राण सोडले. रक्षाबंधनाच्या सणाच्या तोंडावर घडलेल्या या दुर्दैवी प्रसंगामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड हळहळ व्यक्त केली जात आहे. अर्धापूर तालुक्यातील लोणी खुर्द येथील ज्येष्ठ नागरिक सुदामराव हानमंतराव शिंदे (वय ७०) यांचे गुरुवारी मध्यरात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. भावाच्या निधनाची ही दुखाद बातमी पुयणी (जि. नांदेड) येथे राहणाऱ्या त्यांच्या भगिनी अनुसयाबाई बालाजीराव पावडे (वय ६३) यांच्या कानी पडली. आपल्या लाडक्या भावाच्या विरहाचा धक्का त्यांना सहन झाला नाही. भावाच्या वियोगाने व्याकूळ झालेल्या अनुसयाबाईंची प्राणज्योत गुरुवारी सकाळच्या सुमारास मालवली. एकाच दिवशी दोन गावात दुःखद घटना घडली दोघांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे शिंदे आणि पावडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. सुदामराव शिंदे यांच्या पार्थिवावर गुरुवारी दुपारी २ वाजता लोणी खुर्द येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. तर काही तासांच्या अंतराने अनुसयाबाई पावडे यांच्यावर सायंकाळी ५ वाजता पुयणी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडले. अनुसयाबाईंच्या पश्चात पती, दोन मुले माधव पावडे व पोलिस जमादार संतोष पावडे, चार मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. बहीण-भावाच्या अथांग प्रेमाचा हा प्रसंग पाहून अंत्यसंस्कारास उपस्थित प्रत्येकाचे डोळे पाणावले होते. रक्षाबंधनाचा दिवस जवळ आले असताना घडलेल्या या घटनेने सर्वत्र शोककळा पसरली आहे.

## कर्जमाफी साठी फार्मर आयडी अपडेट करून केवायसी अडचण दूर करावी



अर्धापूर (स. गांवकरी) : शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी फार्मर आयडी अपडेट नसल्याने केवायसी प्रक्रिया करताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. फार्मर आयडी अपडेट नसल्यामुळे शेतकऱ्यांना केवायसी करण्यासाठी विलंब होत असून, कर्जमाफीच्या लाभापासून शेतकरी वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या कडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांचे फार्मर आयडी अपडेट करावेत, तसेच केवायसी प्रक्रिया सुलभ व त्वरित होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळविण्यासाठी फार्मर आयडी अपडेट करणे अत्यंत आवश्यक असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी जिल्हाधिकारी नांदेड तसेच तहसीलदार अर्धापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी भाजप युवा मोर्चेचे माजी तालुकाध्यक्ष जठन पाटील मुळे, सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम बंडाळे, शेतकरी विठ्ठल काकडे, भाजयुमोचे आनंद वैद्य, कुश भांगे, शेतकरी संतोष पवार, गणेश सीतापराव व दादाराव देशमुख यांनी निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

## मुख्य चौकातल्या बॅनरची जोरदार चर्चा

अर्धापूर (स. गांवकरी) : पुण्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या स्वागतासाठी लावण्यात आलेल्या बॅनरवर त्यांचा 'हिंदुस्थानचे भावी पंतप्रधान' असा उल्लेख करण्यात आला आहे. राहुल गांधी शनिवारी (ता. २२) पुणे दौऱ्यावर येणार असून, त्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील शास्त्री रोडसह विविध भागांत हे बॅनर झळकले आहेत. दरम्यान, माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी आगामी काळात देशात सत्ताबदल होण्याचा दावा केल्याने या बॅनरची चर्चा रंगली आहे. राहुल गांधी 'छात्रों की गूंज' कार्यक्रमानिमित्त पुण्यात येणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी शहरातील विविध भागांत बॅनर लावण्यात आले असून, त्यावर राहुल गांधी यांचा 'हिंदुस्थानचे भावी पंतप्रधान' असा उल्लेख करण्यात आला आहे.

# शासकीय रुग्णालयात बसवले १० पंखे

## सामाजिक कार्यकर्ते गोविंद गोरे यांच्या पुढाकारातून रुग्ण व नातेवाईकांना दिलासा



नांदेड: (स. गांवकरी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत सामाजिक कार्यकर्ते गोविंद गोरे यांच्या पुढाकारातून डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथे वॉर्ड क्रमांक ६ समोरील परिसरात १० पंखे बसविण्यात आले. डीएमए ग्रुपच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. गेल्या चार वर्षांपासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रुग्णालयात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. पहिल्या वर्षी रुग्णालयाला ३ व्हीलचेअर, दुसऱ्या वर्षी प्रत्येक वॉर्डसाठी नेब्युलायझर, तर तिसऱ्या वर्षी १० व्हीलचेअर उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यंदाही ही सामाजिक कार्याची परंपरा कायम ठेवत वॉर्ड क्रमांक ६ समोरील परिसरात १० पंखे बसविण्यात आले.

रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विशेषतः रुग्णालयातील गर्दीच्या परिसरात पंख्यांची सुविधा उपलब्ध झाल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा दिलासा मिळणार आहे. बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ रोजी या उपक्रमाचे उद्घाटन रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्यासह उपस्थित प्रमुख डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मातेचे कार्य म्हणजे गोरगरीब जनतेची सेवा; हीच खरी ईश्वरसेवा' या सेवाभावी विचारातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमास अधीक्षक डॉ. शिवानंद, उपअधीक्षक डॉ. अजय राठोड, तसेच साखरे, सखाराम लुटे, बालाजी सावंगीकर, भीमराव परोडवाड, सुभाष हाके, परिचारिका शिंदे, लक्ष्मीकांत कळसकर, गोविंद मुंडकर, ऊर्मिला शेळके, जयवंत सूर्यवंशी, ईश्वर गोरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सामाजिक कार्यकर्ते गोविंद गोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजसेवा, लोककल्याण आणि जनहिताचा आदर्श आपल्या कार्यातून निर्माण केला. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त रुग्णसेवेच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवून त्यांच्या लोककल्याणकारी विचारांना कृतीतून अभिवादन करण्यात आले. गरजू रुग्णांसाठी सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# दिव्यांग ३६१ व्यक्तींना आधार



पुणे: (स. गांवकरी)

कृत्रिम अवयवांच्या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, उदयपूर येथील नारायण सेवा संस्थान २३ ऑगस्ट रोजी पुण्यात 3D-प्रिंटेड नारायण मॉड्युलर कृत्रिम अवयव रोपण शिबिर आयोजित करेल. टाटा टेले बिझनेस सर्व्हिसेस आणि न्यूमन अँड एस्सार ग्रुप यांच्या संयुक्त पाठिंब्याने आयोजित केले जाणारे हे शिबिर, दिव्यांग असलेल्या ३६१ व्यक्तींना मोफत आधुनिक कृत्रिम अवयव आणि सहाय्यक साधने प्रदान करेल. शिबिरासोबतच देणगीदार सत्कार समारंभ्ही आयोजित केला जाईल. हे शिबिर सकाळी ८:०० ते संध्याकाळी ६:०० या वेळेत तिरुपती मंगल कार्यालय, टिंगरे नगर, रोड नंबर २, विश्रांतवाडी एअरपोर्ट रोड, पुणे येथे होईल. उद्घाटन सकाळी ११:०० वाजता होईल. या शिबिरात केवळ पूर्व-निवडलेले लाभार्थीच सहभागी होतील. हे शिबिर सकाळी ८:०० ते संध्याकाळी ६:०० या वेळेत तिरुपती मंगल कार्यालय, टिंगरे नगर, रोड नंबर २, विश्रांतवाडी एअरपोर्ट रोड, पुणे येथे होईल. उद्घाटन सकाळी ११:०० वाजता होईल. या शिबिरात केवळ पूर्व-निवडलेले लाभार्थीच सहभागी होतील. संस्थानच्या माहितीनुसार, दिव्यांग असलेल्या २६८ व्यक्तींना २७६ नारायण मॉड्युलर कृत्रिम अवयव बसवले जातील, तर दिव्यांग असलेल्या ६० व्यक्तींना ८५ कॅलिपर्स बसवले जातील.

# सत्संगानंतर कैद्यांनी दुष्कर्म व वाईट सवयी सोडण्याचा केला संकल्प



- संत रामपालजी महाराज यांच्या सत्संगाला कैद्यांची लक्षणीय उपस्थिती
- 'जगण्याचा मार्ग' पुस्तकाचे मोफत वाटप

पुणे: (स. गांवकरी)

येरवडा मध्यवर्ती कारागृहात आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय सत्संगातून कैद्यांना चांगले आचरण, सद्विचार आणि व्यसनमुक्त जीवनाचा संदेश देण्यात आला. सत्संगानंतर भारावलेल्या काही कैद्यांनी दुष्कर्म आणि वाईट सवयी सोडून चांगले जीवन जगण्याचा संकल्प केल्याचे आयोजकांनी सांगितले. गुरुवारी (दि. २०) येरवडा मध्यवर्ती कारागृहात जगद्गुरु तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराज यांच्या विचारांवर आधारित एकदिवसीय सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्संगाला कारागृहातील कैद्यांची लक्षणीय उपस्थिती होती. सत्संगाच्या माध्यमातून जीवनात चांगले कर्म, सद्विचार आणि योग्य मार्गाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. अज्ञानामुळे व्यक्ती चुकीच्या मार्गावर जाऊ शकतो. त्यामुळे आध्यात्मिक ज्ञान आणि सद्विचारांच्या माध्यमातून जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. सत्संग ऐकल्यानंतर अनेक कैद्यांनी वाईट सवयी आणि दुष्कर्मांपासून दूर राहण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. कारागृहातील वातावरणात अशा सकारात्मक उपक्रमांमुळे कैद्यांच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्यास मदत होऊ शकते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# पिंपळे ग्रामपंचायतीतील प्रशासनावर गंभीर आरोप

## वादग्रस्त जमीन प्रकरणात हस्तक्षेप केल्याची तक्रार



- प्रशासनिक अधिकाऱ्यांकडून वादीला मदत केल्याचा आरोप ग्रामसभेच्या ठरावावर सही न केल्याबाबत कारवाईची मागणी

संगमनेर: (स. गांवकरी)

पिंपळे ग्रामपंचायतीच्या प्रशासनासंदर्भात गंभीर स्वरूपाची तक्रार गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांच्याकडे करण्यात आली आहे. प्रशासकीय प्रभारी सरपंच म्हणून कार्यरत असलेल्या यांनी वादग्रस्त जमीन प्रकरणात एका पक्षाला जाणीवपूर्वक मदत केल्याचा तसेच ग्रामसभेच्या मंजूर ठरावावर स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, संबंधित जमीन प्रकरण दिवाणी दावा R.C.S. No. 838/2025 मध्ये न्यायालयीन प्रक्रियेत आहे. या प्रकरणात प्रशासनिक अधिकाऱ्यांकडून वादीच्या बाजूने मदत केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संबंधित अधिकारी नियमितपणे गैरहजर राहत असल्याने ग्रामस्थांना या प्रकरणाची योग्य माहिती मिळत नसल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, दि. 15 ऑगस्ट 2026 रोजी झालेल्या ग्रामसभेतील मुद्दा क्रमांक 8 मध्ये कोर्ट कमिशनरमार्फत मोजणी करण्यासंदर्भातील ठराव सर्वानुमते मंजूर झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मात्र, या मंजूर ठरावावर संबंधितांकडून स्वाक्षरी करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची प्रशासनाने सखोल चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, तसेच आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

ग्रामपंचायत प्रशासन, जमीन वाद आणि ग्रामसभेच्या ठरावाशी संबंधित या तक्रारीमुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून, आता पंचायत समिती प्रशासन या प्रकरणाची काय भूमिका घेते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# रिपाई प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी अक्कलकोट येथे महाआरोग्य शिबिर

## गरजू रुग्णांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : अविनाश मडिखांबे

अक्कलकोट: (स. गांवकरी)



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या ६९व्या वाढदिवसानिमित्त अक्कलकोट येथे सोमवारी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात सकाळी ११ वाजता हे शिबिर होणार असल्याची माहिती रिपाईचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष तथा अक्कलकोट नगरपरिषदेचे आरोग्य सभापती व नगरसेवक अविनाश मडिखांबे यांनी दिली.

या महाआरोग्य शिबिरात विविध आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामध्ये नेत्ररोग, दंतचिकित्सा, कर्करोग, स्त्रीरोग व प्रसूती, बालरोग, हृदयरोग, अस्थिरोग, मधुमेह, मानसोपचार, मेंदू व मणक्याचे आजार तसेच सर्वसाधारण बाह्यरुग्ण तपासणी अशा विविध विभागांचा समावेश आहे. नेत्र तपासणीसाठी डॉ. रमाकांत टेके व डॉ. नबीलाल नदाफ, दंतचिकित्सेसाठी डॉ. प्रथमेश जोशी, कर्करोग तपासणीसाठी डॉ. प्रथमेश मलगोंडा, स्त्रीरोग व प्रसूती विभागासाठी डॉ. श्रीकांत खांडेकर व डॉ. रवी बानसोडे, तर बालरोग विभागासाठी डॉ. स्नेहा वेळापूरकर, डॉ. सुशांत अलाट, डॉ. अमृता कोटी व डॉ. दीपक पाटील उपस्थित राहणार आहेत.

हृदयरोग तपासणीसाठी अपेक्स हॉस्पिटल, सोलापूरचे डॉ. जिशान सय्यद तसेच संदीप अष्टगे सहभागी होणार आहेत. सर्वसाधारण बाह्यरुग्ण विभागात डॉ. शिवा हताळे, डॉ. जय नंदल, डॉ. गुरुशांत चिंचोळे, डॉ. शैलजा माळी, डॉ. रेखा लोकापुरे व डॉ. संजीवनी जवळकोटे रुग्णांची तपासणी करणार आहेत.

मानसोपचार विभागात डॉ. मिलिंद करंजकर व डॉ. सुप्रिया शिवशरण, अस्थिरोग विभागात डॉ. योगेश बागल, डॉ. सचिन संगोळगी व डॉ. संदीप इंगळे, मधुमेह तपासणीसाठी डॉ. शिवा शिवणगी, तर वैद्यकीय तज्ज्ञ म्हणून डॉ. योगेश वेळापुरकर उपस्थित राहणार आहेत. मेंदू व मणक्याच्या आजारांसाठी डॉ. रणजीत कदम मार्गदर्शन करणार आहेत. अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक राठोड यांचीही यावेळी उपस्थिती राहणार आहे. या महाआरोग्य शिबिराचा अक्कलकोट शहर तसेच तालुक्यातील गरजू नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन अविनाश मडिखांबे यांनी केले आहे. राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या आरोग्य उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न करण्यात येत असून, विविध आजारांवरील तज्ज्ञ तपासणीचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळणार आहे

# व्यंकटेश सोळके यांच्या अरसड कादंबरीला बी रघुनाथ पुरस्कार जाहीर

नायगाव: (स. गांवकरी)



नायगाव तालुक्यातील जवाहरलाल नेहरू मा. विद्यालय बरबडा येथील शिक्षक मराठी साहित्यीक बी. रघुनाथ यांची पुण्यतिथी निमित्ताने छत्रपती संभाजीनगर शहरात बी. रघुनाथ स्मृती सोहळा म्हणून साजरी केली जाते. परभणी येथे बी. रघुनाथ महोत्सव घेतल्या जातो. या वर्षीच्या बी. रघुनाथ पुरस्कारासाठी व्यंकटेश सोळंके यांच्या 'अरसड' या कादंबरीची निवड करण्यात आली. ही कादंबरी लोकवाङ्मय गृह मुंबई यांनी प्रकाशीत केली आहे. मराठी साहित्यविश्वात आपल्या लेखनाने स्वतंत्र ठसा उमटविणारे ज्येष्ठ साहित्यिक व्यंकटेश सोळंके यांच्या 'अरसड' या अत्यंत चर्चित कादंबरीस यंदाचा प्रतिष्ठित 'बी. रघुनाथ पुरस्कार' निवड जाहीर झाली आहे. विशेष आनंदाची बाब म्हणजे, सोळंके यांच्या साहित्यिक कारकिर्दीतील हा पहिलाच साहित्यकृती पुरस्कार आहे. त्यांच्या 'अरसड' कादंबरीला मिळालेला हा सन्मान त्यांच्या संवेदनशील लेखनशैलीचा, सामाजिक जाणिवेचा आणि साहित्यिक व्यंकटेश सोळंके जवाहरलाल नेहरू कनिष्ठ महाविद्यालय, बरबडा, ता. नायगाव, जि. नांदेड येथे प्राध्यापक आहेत. विविध नियतकालीके, मासिके यातुन नियमीत लिखाण करणारे सोळंके यांची ही पहिलीच साहित्यकृती आहे. अक्षरायण समीक्षा सदर व शेतीचे अर्थकारण ह्या लेखमाला लिहिलेल्या आहेत.

# आरोग्य केंद्र, स्मशानभूमीच्या विकासासाठी स्थायी समिती सभापतींची पाहणी

## मातृ सेवा आरोग्य केंद्राचा वेळ वाढविणे, औषधांचा नियमित पुरवठा करण्याच्या मागणीची दखल

नांदेड: (स. गांवकरी)

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले यांनी २१ ऑगस्ट रोजी सिडको क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. यावेळी मातृ सेवा आरोग्य केंद्र, सिडको स्मशानभूमी तसेच हडको येथील साई मंगल कार्यालयाची पाहणी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून विविध कामांचा आढावा घेण्यात आला. मातृ सेवा आरोग्य केंद्रातील सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी हे केंद्र हडको येथील साई मंगल कार्यालयाच्या ठिकाणी सुसज्ज इमारतीत स्थलांतरित करण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील, असे स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले यांनी सांगितले. तसेच सिडको



स्मशानभूमीचा विकास करण्यासाठीही आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पाहणी दौऱ्यात स्वीकृत नगरसेवक अंकुश देवसरकर, प्रभाग क्रमांक २० चे भाजप नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे, सौ. सुवर्णा सतीश बसवदे, उपायुक्त अजितपाल संधू, सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग, वैद्यकीय अधिकारी संतोष शिंदे, बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता ठाणेदार, आरोग्य विभागाचे बिडमवार, सोनुले यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, सौ. सुवर्णा बसवदे आणि नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे यांनी सिडको परिसरातील मातृ सेवा आरोग्य केंद्रातील विविध समस्यांकडे पदाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. आरोग्य केंद्रात काही वेळा औषधांचा तुटवडा निर्माण होत असल्याने औषधांचा नियमित पुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच सध्या केंद्राची बाह्यरुग्ण सेवा मर्यादित वेळेत सुरू असल्याने सर्वसामान्य रुग्णांना त्याचा पुरेसा लाभ घेता येत नाही. त्यामुळे बाह्यरुग्ण विभागाची वेळ वाढविण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. मातृ सेवा आरोग्य केंद्र अधिक सुसज्ज करण्यासाठी साई मंगल कार्यालयाच्या इमारतीत स्थलांतर करण्याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या विविध मागण्यांची पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी दखल घेतली. मातृ सेवा आरोग्य केंद्राची बाह्यरुग्ण सेवा अधिक वेळ सुरू ठेवणे, औषधांचा नियमित पुरवठा करणे, आरोग्य केंद्र स्थलांतराबाबत कार्यवाही करणे तसेच सिडको स्मशानभूमीचा विस्तार व विकास करण्याच्या मागण्यांवर सकारात्मक विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले.

### सिडको स्मशानभूमीचा विस्ताराची मागणी

सिडको स्मशानभूमीची पाहणी करताना मृतदेहांवर अंत्यसंस्कार करताना दफनविधीसाठी उपलब्ध असलेली जागा अपुरी पडत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यामुळे स्मशानभूमीसाठी अधिक जागा उपलब्ध करून देणे, संरक्षण भिंत उभारणे आणि परिसराचा विकास करणे याबाबत मागणी करण्यात आली. तसेच स्मशानभूमीत सुरू असलेल्या अत्याधुनिक दहन वाहिनीच्या बांधकामाचीही पाहणी करण्यात आली. संबंधित कामाची सद्यस्थिती जाणून घेऊन आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

# ‘महाराष्ट्राच्या राजकारणासाठी विक्रम पाचपुतेंना सुट्टी द्या’

## रवींद्र चव्हाण यांचे श्रीगोंदकरांना आवाहन : आमदार विक्रम पाचपुते यांच्या नेतृत्वगुणांचे प्रदेशाध्यक्षांकडून कौतुक

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

“आमदार विक्रम पाचपुते हे उत्कृष्ट वक्ते असून समाजातील प्रश्नांची त्यांना उत्तम जाण आहे. अभ्यासू, तरुण आणि गुणी कार्यकर्ता म्हणून त्यांच्यात महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी भूमिका बजावण्याची क्षमता आहे. त्यामुळे श्रीगोंदकरांनी महाराष्ट्राच्या राजकारणासाठी विक्रमला सुट्टी द्यावी,” असे भावनिक आवाहन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. आमदार विक्रम पाचपुते यांच्या निवासस्थानी आयोजित



कार्यकर्त्यांच्या बैठकीत चव्हाण बोलत होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे बैठकीतील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

‘प्रश्न मांडून थांबत नाहीत; सातत्याने पाठपुरावा करतात’

रवींद्र चव्हाण म्हणाले, “विक्रम पाचपुते यांचे वय अजून कमी आहे. ते तरुण असून प्रचंड प्रवास करण्याची क्षमता त्यांच्यात आहे. एखादा प्रश्न समोर आल्यानंतर तो केवळ मांडून थांबणे, ही त्यांची कार्यपद्धती नाही. प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करून तो सोडविण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. समाजातील विविध घटकांचे प्रश्न समजून घेऊन त्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची त्यांची वृत्ती आहे.”

पाचपुते यांच्या कार्यशैलीचे कौतुक करताना चव्हाण यांनी त्यांच्या अभ्यासू वृत्तीचा आणि वक्तृत्वाचा विशेष उल्लेख केला. “विक्रम हा केवळ आमदार म्हणून नव्हे, तर अभ्यासू आणि प्रभावी कार्यकर्ता म्हणून पुढे येत आहे. त्यांच्या वक्तृत्वात मुद्दा आहे, अभ्यासात खोली आहे आणि प्रश्नांच्या पाठपुराव्यात सातत्य आहे. अशा तरुण नेतृत्वाची महाराष्ट्राला गरज आहे,” असे चव्हाण यांनी नमूद केले.

श्रीगोंदा मतदारसंघाच्या राजकारणात सक्रिय असलेल्या विक्रम पाचपुते यांना राज्याच्या राजकारणात मोठी संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करताना रवींद्र चव्हाण यांनी श्रीगोंदकरांना थेट आवाहन केले.



**आळेफाटा, ता. जुन्नर :** राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या १९ व्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त आळेफाटा ब्रह्माकुमारीज सेंटर आणि राजयोग सेवा प्रभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वबंधुत्व रक्तदान महाअभियानाचे आयोजन करण्यात आले होते. हे रक्तदान शिबिर आळेफाटा येथील ब्रह्माकुमारीज सेंटरमध्ये सकाळी ९ ते दुपारी ५ या वेळेत पार पडले. यावेळी आळेफाटा परिसरातील तरुण-तरुणी, महिला, व्यापारी व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत ८४ नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.याप्रसंगी ब्रह्माकुमारीज सेंटरच्या संचालिका ब्र.कु.शितल दीदी यांनी दादी प्रकाशमणी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, "दादीजींनी संपूर्ण जीवन विश्वबंधुत्व आणि मानवसेवेसाठी समर्पित केले.

## थोडक्यात बातम्या...



### बायोस्टॅड इंडिया लिमिटेड मुंबई कंपनी तर्फे शिष्यवृत्तीचे वितरण

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील येथील जवाहरलाल नेहरू माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा येथे बायोस्टॅड इंडिया लिमिटेड मुंबई या कंपनीतर्फे बायोझाईम प्रगती शिष्यवृत्ती वितरण करण्यात आली बायोस्टॅड इंडिया लिमिटेड कंपनी भारतातील कृषी क्षेत्रातील अग्रगणे कंपनी आहे गेल्या ४० वर्षापासून गुणवत्तापूर्ण दर्जेदार कृषी उत्पादने बाजारात देते. बायोस्टॅड इंडिया लिमिटेड कंपनी प्रत्येक जिल्ह्यातील दोन शाळा निवडुन त्या शाळेतील गरीब शेतकरी कुटुंबातील अभ्यासू होतकरू १० विद्यार्थी निवडून प्रत्येकी विद्यार्थ्यांना तीन हजार रुपये शिष्यवृत्ती दर वर्षी वाटप करते. नांदेड जिल्हातील नायगाव तालुक्यातील बरबडा येथील जवाहरलाल नेहरू माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा शाळेतील इयत्ता दहावी वर्गातील खालील दहा विद्यार्थी, सुपारे साक्षी शिवाजी, अनिकेत बालाजी मुंडकर, शेख सुहाना अहमद, शिवम शिवराज कुंभारगावे, वसुधा खंडू मुंडफळे, श्रुती बाबू शिंगेवाड, दुर्गा तुकाराम सदापतनवार, रोशनी माधवराव शिंदे, नागेश मालु सुरणे, काजल साहेबराव पवार, सदरील विद्यार्थ्यांना शिष्यवृती व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप मुख्याध्यापक गणेश बडूरे सर. आणि नांदेड येथील गोदावरी कृषी केंद्राचे संचालक अर्जुन दमकोंडवार, कृषिरत्न हायटेक नर्सरी घुंगराळा संचालक शीतल पाटील, संत कृपा कृषी सेवा केंद्र बरबडा संचालक गोपाल आलेवाड, शिवशक्ती कृषी सेवा केंद्र बरबडा संचालक शंकर शिंदे, बायोस्टॅड इंडिया लिमिटेड कंपनीचे, टेरीटरी मैनेजर विजयकुमार जोरूळे, डेवलपमेंट ऑफिसर किशोर ठाकरे, उमरी नानाराव खांडरे, अर्धापूर संभाजी गोरे, आदींची उपस्थिती होती हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी गोरे यांनी केले.

### ढोरजा येथील श्री काशी विश्वनाथ यात्रोत्सवाला लाखो भाविकांची गर्दी



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी ढोरजा येथील श्री काशी विश्वनाथ देवस्थानचा यात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. मध्यरात्रीपासूनच दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या लाखो भाविकांनी श्री काशी विश्वनाथांचे दर्शन घेतले. ढोरजा येथील श्री काशी विश्वनाथ देवस्थान हे लाखो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असून, निसर्गरम्य परिसरामुळे हे ठिकाण पर्यटनस्थळ म्हणूनही प्रसिद्ध आहे. यात्रेनिमित्त मंदिर परिसरात लहान मुलांची खेळणी, विविध खाद्यपदार्थांची दुकाने, पाळणे आदींची मोठी रेलचेल होती. त्यामुळे महिला, लहान मुले आणि नागरिकांनी यात्रेचा आनंद घेत मोठी गर्दी केली. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत देवस्थान परिसरात विविध विकासकामे करण्यात आली आहेत. काही सुशोभीकरणाची कामे सध्या सुरू आहेत. तसेच तालुक्याचे आमदार विक्रमदादा पाचपुते यांच्या सहकार्याने देवस्थानकडे येणाऱ्या डांबरी रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने भाविकांना ये-जा करताना मोठी सुविधा झाली. यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस मित्र संघटनेच्या स्वयंसेवकांनी दिवसभर दर्शनबारी व पार्किंग व्यवस्थेचे नियोजन करून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य केले. ढोरजा गावातून मंदिराकडे येणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने भाविकांची गैरसोय टळली.

### कळवणचा बालेकिल्ला परत मिळवण्याचा निर्धार



कनाशी (स. गांवकरी) : कळवण तालुका पुन्हा एकदा काँग्रेसच्या ताब्यात आणण्यासाठी काँग्रेसने कंबर कसली आहे. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांची मुंबईत खास भेट घेऊन जिल्हाध्यक्ष रामचौरे आणि कळवण तालुकाध्यक्ष के.के. गांगुर्डे यांनी आगामी निवडणुकांची रणनीती आणि तालुक्यातील रखडलेल्या विकास कामांचा मुद्दा थेट वरिष्ठ पातळीवर मांडला. या बैठकीत कळवणच्या राजकारणाला नवे वळण मिळण्याचे संकेत मिळाले आहेत. कळवण हा पूर्वीपासून काँग्रेसचा बालेकिल्ला होता आणि आजही आहे असा ठाम विश्वास गांगुर्डे यांनी व्यक्त केला गेल्या अनेक वर्षांपासून कळवण तालुक्यातील रस्ते, पाणी, आरोग्य आणि आदिवासी वस्त्यांमधील पायाभूत सुविधा रखडल्या आहेत. या सर्व प्रश्नांची फाईल घेऊनच रामचौरे आणि गांगुर्डे यांनी चव्हाणांची भेट घेतली. आदिवासीबहुल गावांमध्ये निधी न मिळाल्याने होणारी अडचण त्यांनी सविस्तरपणे मांडली. चव्हाण यांनी या कामांना गती देण्यासाठी पक्षस्तरावरून पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

# जुन्नर अत्याचार प्रकरणातील आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा द्या

## डॉ. नीलम गोऱ्हे यांची मागणी : गावपातळीवर बालसुरक्षा यंत्रणा मजबूत करण्याची व युवकांमध्ये लैंगिक संवेदनशीलतेची मोहीम राबविण्याची गरज

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक आहे. या प्रकरणातील आरोपीलाअटक करण्यात आली असून, आरोपी हा पीडित मुलीच्या परिचयातील असल्याची माहिती मिळाली आहे.त्याने मुलीची दिशाभूल करून तिच्यावर अत्याचार केल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे.या प्रकरणात उपलब्ध सर्व पुरावे,साक्षी व शवविच्छेदन अहवालाच्या आधारे तपास पूर्ण करून आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा मिळण्यासाठी पोलिसां नी प्रभावीपणे पाठपुरावा करावा,अशी मागणी शिवसेना नेत्या व विधानपरिषद सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर डॉ. गोऱ्हे यांनी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल तसेच संबंधित अधिकाऱ्यां कडून



प्रकरणाची माहिती घेतली. तपास योग्य दिशेने सुरू असून आरोपीला अटक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नसरापूर येथील घटनेचा संदर्भ देताना डॉ.गोऱ्हे म्हणाल्या की,त्या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार तसेच पुणे शहर आणि ग्रामीण पोलिसांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.पीडित कुटुंबाला धीर देण्यासोबतच न्यायालयीन प्रक्रियेतही योग्य पद्धतीने पुरावे व साक्षी समोर आल्याने आरोपीला फाशीची शिक्षा झाली.त्याचप्रमाणे जुन्नर प्रकरणातही अपेक्षा आहे की, आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा मिळावी. केवळ मुलींमध्ये प्रबोधन करून चालणार नाही; युवकां मध्ये लैंगिक संवेदनशीलतेची मोहीम राबविण्याची गरज महिला आणि बालिकांच्या सुरक्षेसाठी केवळ मुलींमध्ये प्रबोधन करणे पुरेसे नाही. गावपातळीपर्यंत शासनाच्या यंत्रणा अधिक सक्रिय असणे आवश्यक आहे.

विशेषतः युवकांमध्ये लैंगिक संवेदन शीलता,जबाबदार वर्तन आणि महिलांचा सन्मान याबाबत सातत्याने जन जागृती करणे गरजेचे आहे, असे डॉ.गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. समाजमाध्यमे आणि विविध माध्यमांमधून मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणाऱ्या अश्लील व हिंसक आशयाचा तरुणांच्या मानसिकतेवर होणारा परिणामही गांभीर्याने तपासण्याची गरज आहे. अशा आशयामुळे लैंगिक हिंसेबाबत चुकीच्या कल्पना आणि विकृत मानसिकता वाढत असेल, तर त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी व्यापक मोहीम हाती घेण्याची गरजअसल्याचे मत डॉ.गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

### गावपातळीवर बालसुरक्षा यंत्रणा मजबूत करण्याची गरज

अल्पवयीन मुली आणि मुलांच्या सुरक्षेसाठी गावपात- ळीवर समुपदेशन,जनजागृती तक्रार निवारण आणि तत्काळ हस्तक्षेपाची यंत्रणा अधिक प्रभावी करण्याचीआवश्यकता आहे.या दृष्टीने संबंधित यंत्रणां शी चर्चा करून व्यापकमोहीम राबविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचेही डॉ.गोऱ्हे यांनी सांगितले.

# ठाणे जिल्ह्यात खत खरेदीसाठी ‘फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल’ प्रणाली लागू!

ठाणे : (स. गांवकरी)

शेतकऱ्यांना अनुदानित खतांची खरेदी अधिक सुलभ, पारदर्शक आणि शेतकरी हिताची करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात ‘फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल’ ही नवीन प्रणाली लागू करण्यात येणार आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना मोबाईलवरील अर्जाच्या माध्यमातून घरबसल्या आपल्या गरजेनुसार तसेच जवळच्या खत विक्री केंद्रातून युरिया, डीएपी यांसारखी अनुदानित खते ऑनलाइन बुक करता येणार आहेत. आधार क्रमांक किंवा शेतकरी ओळख क्रमांकाच्या माध्यमातून अर्जावर नोंदणी करता येणार आहे. या प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय मास्टर प्रशिक्षकांच्या माध्यमातून क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी आणि कृषी निविष्ठा विक्रेत्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. तसेच शेतकऱ्यांना नवीन प्रणालीची माहिती व्हावी यासाठी क्षेत्रीय स्तरावर जनजागृती व प्रचार-प्रसिद्धी सुरू करण्यात आली आहे. क्यूआर संकेताच्या माध्यमातून खत खरेदीची प्रक्रिया शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीच्या सुपीकता निर्देशांकानुसार आवश्यक खतांची मात्रा तपासून ऑनलाइन बुकिंग करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे. अर्जाची प्रक्रिया सोपी असून प्रथम मोबाईलवर ‘फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल’ अर्ज डाउनलोड करून राज्य निवडावे. त्यानंतर आधार क्रमांक किंवा कृषी ओळख क्रमांक टाकून भ्रमणध्वनीवर प्राप्त झालेल्या एकवेळच्या संकेतांकाद्वारे पडताळणी करावी. जमिनीची माहिती तपासून पीक निवडावे आणि शासनाच्या सामान्य खत शिफारशीनुसार आवश्यक खताचे प्रमाण निश्चित करावे.



# सार्थक बिबवे यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे वतीने सन्मान

अकोले : (स. गांवकरी)

सीईटी व बारावीच्याचे परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल सार्थक निलेश बिबवे यांनचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघांचे वतीने उद्योजक रामनाथ कळसकर यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. कळस येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, कळस सोसायटीचे संचालक निलेश बिबवे, माधव बिबवे यांचे उपस्थित सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सार्थक बिबवे याला १२ वी विज्ञान च्या परीक्षेत ९६.१७% गुण मिळवले असून तो संगमनेर अकोले तालुक्यात विज्ञान विभागात प्रथम आहे. गणित आणि भौतिकशास्त्र या विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. तसेच महा सीईटी पिसीबी ग्रुप मध्ये ९९.९१ पेरसेनटाईल व महा सीईटी पिसीएम ग्रुप मध्ये ९९.७१ पेरसेनटाईल गुण मिळवले. त्याचे १२वी चे शिक्षण सह्याद्री ज्युनिअर कॉलेज, संगमनेर येथे झाले. दहावी पर्यन्त चे शिक्षण अभिनव पब्लिक स्कुल अकोले येथे झाले असून कळस सोसायटी चे संचालक निलेश बिबवे यांचे चिरंजीव असून अगस्ती साखर कारखान्याचे संचालक कै कॉ शांताराम वाळुंज यांचे नातु आहेत.

# श्री साईबाबा मंदिर कौठा येथे महापौर कविता मुळे यांची सदिच्छा भेट; परिसर विकासाचे आश्वासन

## हायमास्ट दिवे, पथदिवे व स्वच्छतेच्या समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन



नांदेड : (स. गांवकरी)

श्रावण मासानिमित्त कौठा येथील श्री साईबाबा मंदिरात महापौर सौ. कविता संतोष मुळे यांनी सदिच्छा भेट देऊन साईबाबांचे दर्शन घेतले. यावेळी महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी यांच्यासह त्यांनी मंदिर परिसर तसेच गोशाळेची पाहणी केली. परिसरातील विविध समस्यांची पाहणी करून आवश्यक त्या विकासकामांसाठी तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन महापौरांनी दिले. श्री साईबाबा मित्र मंडळ, कौठा यांच्या वतीने २० ऑगस्ट रोजी श्रावण मासानिमित्त साईबाबा मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी दुपारी महाआरतीनंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. या महाप्रसादाचे आयोजन माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, माधव गुरुपवार, अशोक दिल्लेराव, रमेश यादव, हेमराज लढ्ढा, आकाश व्यवहारे आणि साकेत व्यवहारे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. यावेळी महापौर कविता मुळे, महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी, नगरसेवक सुमित मुथा, नगरसेवक प्रतिनिधी उमेश पवळे, अमृता ठाकूर, संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, सुवर्णा सतीश बसवदे, कविता गडम, राजू लांडगे, राजू पाटील काळे, संतोष मोरे यांच्यासह नगरसेविका सुलोचना धोंडीबाराव काकडे उपस्थित होते. मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने महापौर कविता मुळे, महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी तसेच उपस्थित मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सायंकाळच्या वेळी गोदावरी नदीची गंगा आरती होत असताना परिसरात पुरेशी प्रकाश व्यवस्था नसल्याने अंधाराचे साम्राज्य निर्माण होते. त्यामुळे येथे हायमास्ट दिवा बसविणे, परिसराची दैनंदिन स्वच्छता करणे तसेच मुख्य रस्त्यावरील बंद पथदिवे तातडीने सुरू करणे, अशी मागणी करण्यात आली. या मागण्यांची महापौरांनी तातडीने दखल घेत संबंधित विभागाला आवश्यक सूचना देण्याचे आश्वासन दिले. परिसरात नियमित स्वच्छता करण्यात येईल तसेच हायमास्ट व विद्युत दिव्यांची व्यवस्था करून प्रकाश व्यवस्था सुधारण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

श्रावण मासाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या महाप्रसादाचा उपस्थित मान्यवरांनी व भाविकांनी लाभ घेतला. मंदिर परिसराच्या विकासासाठी प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन मिळाल्याने भाविक व नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

### गोशाळेची पाहणी; परिसरातील समस्यांवर चर्चा

महापौर कविता मुळे यांनी यावेळी मंदिर परिसरातील गोशाळेलाही भेट देऊन पाहणी केली. परिसरातील स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि रस्त्यांवरील पथदिव्यांची समस्या याबाबत नागरिक व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

# समर्थ शैक्षणिक संकुलात भव्य रोजगार मेळावा

## विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना उद्योगविश्वाशी जोडणारा उपक्रम; नामांकित कंपन्यांचा सहभाग

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचालित समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे-बांगर वाडी येथे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.अभियांत्रिकी, फार्मसी, कॉम्प्युटर सायन्स व विविध शैक्षणिक विभागांतील तब्बल ३१० विद्यार्थ्यांनी या रोजगार मेळाव्यात सहभाग नोंदविला. विविध नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींच्या सहभागामुळे मेळाव्यास उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मेळाव्यात



सहभागी झालेल्या कंपनी प्रतिनिधींचा संस्थेचे सचिव विवेक शेळके व विश्वस्त वल्लभ शेळके यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या रोजगार मेळाव्यात आयसीआयसीआय बँक: - अरबाज शेख,अजिओ फार्मास्युटिकल्स: -गणेश कांबळे,मार्क्सन्स फार्मा लि:-- काजल हेळगावकर, पॅट्रोटॉनिक्स कन्सल्टिंग सर्व्हिसेस:-सविता शिवशरण, सीमेन्स कंपनीच्या वतीने: - गोपाळ आवळे व नितीन कदम,टेक महिंद्रा कंपनीच्या वतीने: -कल्लोल बोस,जॅबिल सर्किट इंडिया प्रा.लि. ज्ञानेश्वर घाटोळे व आकाश गायकवाड,एआरएम इंडिया च्या वतीने:-विश्वनाथ पाटोळे, एलिओस मॅनेजमेंटकन्सल्टिंग प्रा.लि:संतोष स्वामी निर्माण ऑर्गनायझेशन:- शिवलिंग स्वामी यांनी सहभाग घेत विद्यार्थ्यांच्या निवड प्रक्रियेस मार्गदर्शन केले. सहभागी कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता,तांत्रिक ज्ञान,संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, आत्म विश्वास आणि व्यक्तिमत्त्व या विविध बाबींच्या आधारे मुलाखती व निवड प्रक्रिया घेतली. विद्यार्थ्यांना थेट उद्योग प्रतिनिधींशी संवादसाधण्याची स्वतःची कौशल्ये मांडण्याची तसेच उद्योगक्षेत्रातील अपेक्षा समजून घेण्याची महत्त्वपूर्ण संधी या माध्यमातून मिळाली. रोजगार मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये करिअरविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.

शिक्षण पूर्ण केल्यानंतर उपलब्ध असलेल्या विविध रोजगाराच्या संधी, उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजा, आवश्यक तांत्रिक कौशल्ये आणि कंपन्यांच्या अपेक्षा यांची विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष माहिती मिळाली. त्यामुळे हा मेळावा केवळ रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारा उपक्रम न ठरता विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख,कौशल्यविकासाची दिशा देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.समर्थशैक्षणिक संकुलाच्या वतीने विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच उद्योगांच्या गरजेनुसार आवश्यक कौशल्ये मिळावीत, यासाठी सातत्याने विविध प्रशिक्षण,कार्यशाळा, औद्योगिक भेटी, मार्गदर्शनपर कार्यक्रम आणि प्लेसमेंट उपक्रमांचे आयोजन केले जाते. उद्योगांच्या गरजा आणि विद्यार्थ्यांची कौशल्ये यामध्ये समन्वय साधून विद्यार्थ्यांना रोजगारासाठी सक्षम बनविण्यावर संस्थेचा विशेष भर आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २४९। किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार दि. २२ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## ‘सीएसआर’ निधीच्या वापरासाठी राज्यात स्थापन होणार ‘महा सीएसआर प्राधिकरण’

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रात कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) निधीचा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि समन्वयित वापर करण्यासाठी ‘महा सीएसआर प्राधिकरण’ स्थापन करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले. सीएसआर क्षेत्रातील विविध उपक्रम सध्या वेगवेगळ्या पातळ्यांवर आणि स्वतंत्रपणे राबविले जात असल्याने त्यांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या प्राधिकरणाची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**■ शहर मार्गदर्शक आणि स्थानिक माहिती मिळवणे**
**■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे याबाबत बैठक झाली. यावेळी त्यांनी सांगितले की, प्रस्तावित ‘महा सीएसआर प्राधिकरणा’मार्फत सीएसआर निधीचे समन्वयन, निरीक्षण आणि योग्य वापर सुनिश्चित करण्यावर भर देण्यात यावा. शासनाच्या प्राधान्यक्रमातील प्रकल्पांची दर्जेदार प्रकल्प बँक तयार करून ती कंपन्या आणि स्वयंसेवी संस्थांना उपलब्ध करून द्यावी, सीएसआरसाठी पात्र ठरलेल्या लघु व मध्यम उद्योगांना योग्य प्रकल्प आणि स्वयंसेवी संस्था निवडण्यासाठी मार्गदर्शन करावे, तसेच



राज्यातील उत्कृष्ट सीएसआर उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. शासनाच्या प्राधान्याच्या प्रकल्पांना आवश्यक त्या ठिकाणी सीएसआर निधीच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देण्याचा यामागील उद्देश आहे.

‘सीएसआर’मधून उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पांच्या देखभाल आणि दुरुस्तीवर विशेष भर देण्यात यावा. अनेकदा प्रकल्प उभारल्यानंतर त्याच्या देखभालीसाठी निधी उपलब्ध होत नसल्याने काही वर्षांनी ते प्रकल्प निष्क्रिय होतात. ही स्थिती टाळण्यासाठी प्रस्तावित सीएसआर प्राधिकरणामार्फत जुन्या प्रकल्पांच्या देखभाल–दुरुस्तीला प्राधान्य देण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

परदेशातील तसेच राज्याबाहेरील महाराष्ट्राशी संबंधित नागरिकांच्या सहभागातून सीएसआर व सामाजिक विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ‘डायस्पोरा कनेक्ट’ संकल्पनेचाही अभ्यास करण्याचीही सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. या प्राधिकरणाचे अध्यक्ष हे मुख्यमंत्री असतील तर गव्हर्निंग कौन्सिलमध्ये वरिष्ठ अधिकारी तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींचा समावेश असेल. मुख्य कार्यकारी अधिकारी हे या गव्हर्निंग कौन्सिलचा सदस्य–सचिव तसेच कार्यकारी कौन्सिलचा प्रमुख असेल.

## केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधी खर्चात शालेय शिक्षण विभाग अव्वल

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

केंद्र पुरस्कृत योजनांच्या (सीएसएस) २०२५–२६ या आर्थिक वर्षातील निधी विनियोगात महाराष्ट्रातील विविध विभागांनी अत्यंत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विभागनिहाय उपलब्ध निधी आणि त्याच्या खर्चाचा आढावा घेतला असता, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने तब्बल ९६ टक्के निधीचा यशस्वी विनियोग करून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या विभागाची अर्थसंकल्पाच्या तुलनेत निधी उपयोगिता ९९.९ टक्के इतकी प्रभावी राहिली आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित एका उच्चस्तरीय बैठकीत केंद्रीय योजनांच्या निधीच्या उपलब्धतेसह त्याच्या विनियोगाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत विविध विभागांच्या कामगिरीची आकडेवारी समोर आली. शालेय शिक्षण विभागापाठोपाठ सहकार व पणन आणि वस्त्रोद्योग विभागाने ९९ टक्के, गृह विभागाने ९९ टक्के, मृद व जलसंधारण विभागाने ९८ टक्के, तर कृषी व संलग्न विभागाने ९४ टक्के निधीचा विनियोग केला

**■ ९६ टक्के निधीचा विनियोग; कृषी, ग्रामीण विकास आणि महिला-बाल विकास विभागांचीही उल्लेखनीय कामगिरी**

आहे. तसेच ग्रामविकास विभागाने ८६ टक्के निधी खर्च केला असून ग्रामीण विकाससाठी १० हजार २८३ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी ९ हजार ८७४ कोटी रुपये वितरित झाले होते, त्यातून ८ हजार ५३७ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

महिला व बाल विकास विभागानेही उत्तम कामगिरी करत वितरित निधीच्या तुलनेत ८३ टक्के निधीचा विनियोग केला आहे. नियोजन विभागाने १११ टक्के निधी उपयोगिता नोंदवली असून, मनरेगा योजनेमध्ये वितरित निधीच्या तुलनेत १०० टक्के निधीचा पूर्ण विनियोग करण्यात आला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने ७५ टक्के निधी खर्च केला असला तरी अर्थसंकल्पाच्या तुलनेत त्याची उपयोगिता १०१ टक्के नोंदवली गेली आहे. तसेच, प्रधानमंत्री आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशनमध्ये १११ टक्के निधी उपयोगिता साध्य करण्यात आली आहे.

## इलेक्ट्रीक ट्रॅक्टरद्वारे पर्यावरणपुरक शेतीसाठी संजीवनीचे पहिले पाउल : आमदार विवेक कोल्हे

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

डिझेलच्या दरात सातत्यांने वाढ होत असल्यांने शेती मशागतीच्या तत्सम खर्चात दिवसेंदिवस शेतक–यांसमोर नवनविन प्रश्न निर्माण होत आहे त्यासाठी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने पर्यावरण पूरक आधुनिक तंत्राच्या वापराला सर्वोच्च प्राधान्य देत इलेक्ट्रीक ट्रॅक्टरद्वारे पर्यावरणपुरक शेतीसाठी पहिले पाउल टाकले असल्याचे प्रतिपादन आमदार विवेक भैय्या कोल्हे यांनी केले.



माँत्रा कंपनीने शेती व अन्य कामासाठी ४५ एच. पी. क्षमतेच्या इलेक्ट्रीक ट्रॅक्टरची नव्यांने निर्माती केली असुन राज्यात सर्वप्रथम सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने सदर ट्रॅक्टरची खरेदी केली त्याची पहिली प्रात्याक्षीक राईड श्रीसाईबाबांच्या शिर्डी येथे गुरूवारी घेण्यांत आली त्याप्रसंगी ते बोलत होते.

प्रारंभी मात्रा इलेक्ट्रीकचे महाराष्ट्र विभागीय प्रमुख प्रकाशगिरी प्रास्तविक करतांना म्हणांले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधुनिक डिजीटल तंत्रज्ञानातुन आत्मनिर्भर विकसीत भारतात पर्यावरणपुरक उपक्रमांना सातत्यांने प्राधान्य दिले असुन त्यातुनच या ट्रॅक्टरची निर्मीती करण्यांत आली आहे. विक्री विभागाचे बलराम मुर्ती म्हणाले की, शेतीतील दैनंदिन कामासाठी मात्रा इलेक्ट्रीक ४५ एचपी क्षमतेचा ट्रॅक्टर दोन तासांच्या सिंगल चार्जमध्ये १०० किलोमिटर प्रवासाची क्षमता असुन त्याच्या वापरातुन डिझेलच्या खर्चात मोठया प्रमाणांत बचत होते. आमदार विवेक भैय्या कोल्हे यांनी या ट्रॅक्टरची तांत्रीक वैशिष्टये व कार्यपध्दती जाणुन घेतली.

आमदार विवेकभैय्या कोल्हे पुढे म्हणाले की, अमेरिका इस्त्रायल विरूध्द इराणच्या युध्दात आपल्याला पेट्रोल, डिझेल, गॅस संदर्भात मोठया प्रमणांत अडचणींचा सामना करावा लागला. शेतकऱ्यांना शेतीची कामे करताना अन्य पर्यायी मार्गाचा अवलंब करताना असंख्य त्रासाला सामोरे जावे लागले. या इलेक्ट्रीक ट्रॅक्टरच्या सहायांने शेतीतील मशागतीची कामे केली तर पर्यावरणाची हानी कमी होते, वेळेबरोबरच इंधन खर्चात मोठी बचत होते.

## शेतीच्या उत्पादकता वाढीसाठी डिजिटल ट्विन लर्निंग प्रकल्प : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**कापूस,सोयाबीन,तूर, ऊस, संत्रे, हळद, कांदा व मका पिकनिहाय शेतकऱ्यांची करणार निवड**

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

कृषि विभागाने राज्यातील शेतीचे उत्पादन वाढण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह तंत्रज्ञान, ड्रोन, आयओटी सेन्सर्स आणि डेटा ॲनालिटिक्सवर आधारित अभ्यास करावा. कापूस, सोयाबीन, तूर,ऊस,संत्रे,हळद,कांदा व मका या पिकांसाठी ’शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व ’डिजिटल ट्विन लर्निंग’ प्रकल्प महाराष्ट्रात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यासाठी पहिल्या टप्प्यात दहा हजार शेतकऱ्यांची निवड करावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे’ शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व ’डिजिटल ट्विन लर्निंग’ प्रकल्प सादरीकरणाबाबत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी बैठकीत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, ऑनलाईन व्ही.सी.व्दारे कृषी राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, सहकार राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल,अपर मुख्य सचिव वित्त विकास चंद्र रस्तोगी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, नानाजी कृषी संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालक मीनल करनवाल, सकाळ समुहाचे अध्यक्ष प्रताप पवार, ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्राध्यापक अजित जावकर, मायक्रोसॉफ्टच्या सपना मोहरिया, कृत्रिम बुद्धिमत्ता व ग्रोटेक नाविन्यता केंद्राचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी पराग दाभाडे, ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलवडे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हवामान बदल,पाणीटंचाई,जमिनीची घटती सुपीकता, कीड व रोगांचा वाढता प्रादुर्भाव,वाढता उत्पादन खर्च या आव्हानांवर मात करण्यासाठी बारामती येथील ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टने ’शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व ’डिजिटल ट्विन लर्निंग’ प्रकल्प विकसित केला आहे. या प्रकल्पाचा विभागनिहाय पिकवार अभ्यास करावा.पिकांची वाढ, पाण्याची गरज, जमिनीतील ओलावा, हवामान, कीड–रोगांचा प्रादुर्भाव आणि संभाव्य उत्पादन याबाबत विविध स्त्रोतांमधून माहिती संकलित करून एकत्रित सक्षम डिजिटल प्रणाली तयार करावी. मिळणाऱ्या माहितीचे मशीन लर्निंगच्या माध्यमातून विश्लेषण करून शेतकऱ्यांना पीकनिहाय आणि शेतनिहाय सल्ला देण्याची गरज असून जेणेकरून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल असेही ते म्हणाले.

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा मोठा निर्णय! ३७४ हेक्टर जमिनीवरील ‘महाराष्ट्र शासन राखीव वने’ नोंद कायम

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

भाईंदरपाडा (ओवळे) येथील तब्बल ३७४ हेक्टर ७९ आर वनजमिनीच्या मालकी हक्कावरून सुरू असलेल्या वादात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे ठाणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. या जमिनीच्या अधिकार अभिलेखावर खासगी व्यक्तींच्या नावाने करण्यात आलेली फेरफार नोंद क्रमांक ९७५ रद्द करून संबंधित जमिनीवर पुन्हा ‘महाराष्ट्र शासन राखीव वने’ अशी नोंद कायम ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे भाईंदरपाड्यातील मोठ्या वनक्षेत्रावर खासगी मालकीच्या नोंदी होण्याचा मार्ग तूर्तास बंद झाला असून, या संपूर्ण प्रकरणाची तीन महिन्यांत सखोल चौकशी करण्याचे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

मौजे भाईंदरपाडा (ओवळे), ठाणे येथील जुना सर्व्हे क्रमांक २९१ पैकी नवीन सर्व्हे क्रमांक २२/१, क्षेत्र ३७४–७९–५० हेक्टर, तसेच २२/४, २२/५ आणि जुना सर्व्हे क्रमांक २९७ पैकी नवीन सर्व्हे क्रमांक २१ या जमिनी या वादाच्या केंद्रस्थानी आहेत. या जमिनीवर पूर्वीपासून वन विभागाचा



दावा असून, संबंधित क्षेत्र भारतीय वन अधिनियमाच्या तरतुदींनुसार वन म्हणून अधिसूचित करण्यात आल्याचे वन विभागाने महसूलमंत्र्यांसमोरील सुनावणीत नमूद केले आहे.

**२०१५ मध्ये खासगी नावे दाखल**

महाराष्ट्र महसूल न्यायाधीकरणाने ५ मार्च २०१५ रोजी दिलेल्या निर्णयात संबंधित जमीन ‘वन’ या संज्ञेत येत नसल्याचे नमूद केले होते. या निर्णयानंतर फेरफार नोंद क्र. ९७५ प्रमाणित करून अधिकार अभिलेखावर खासगी व्यक्तींची नावे दाखल करण्यात आली आणि ‘महाराष्ट्र शासन राखीव वने’ ही नोंद कमी करण्यात आली. मात्र या फेरफार नोंदीच्या प्रक्रियेवर महसूल प्रशासनाने आक्षेप घेतला. उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी १ ऑगस्ट २०१५ रोजी फेरफार नोंद क्र. ९७५ आणि संबंधित फेरफार नोंदी रद्द केल्या.

## ...या जिल्ह्यात सुरत-चेन्नई मार्गाला उच्च न्यायालयाची स्थगिती ! कोपरगाव

**(समर्थ गांवकरी)**

सुरत–.......चेन्नई या ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्गासाठी अहिल्यानगर जिल्हातील संगमनेर तालुक्यातील गावांतील भूसंपादनासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ (४८ चा १९५६) च्या कलम ३ (जी) अन्वये घोषित केलेल्या निवड्यांना मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याची माहिती शेतकऱ्यांचे वकील व शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ड.अजित काळे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.त्यामुळे संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

सुरत–चेन्नई ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्गाच्या (सध्याचा नाशिक–अक्कलकोट/चेन्नई कॉरिडॉर) अहिल्यानगर जिल्ह्यातील भूसंपादन प्रक्रिया अंतिम आणि प्रगत टप्प्यात आहे.या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील सुमारे ४९ गावांमधील जवळपास दीड हजार हेक्टर जमीन संपादित करण्याचे नियोजन असून,संगमनेर उपविभागीय कार्यालयाकडून मोजणी व मोबदला वाटपाचे काम सुरू आहे.हा सहापदरी ग्रीनफिल्ड महामार्ग अहिल्यानगर जिल्ह्यावरून जातो.जिल्ह्यातून जाणारा हा टप्पा नाशिक–अक्कलकोट मार्गाचा भाग आहे.पालकमंत्र्यांच्या आढावा बैठकीत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण पारदर्शकतेने करण्याचे आदेश दिले असले तरी होताना दिसून येत नाही त्यामुळे संगमनेर तालुक्यातील दुष्काळी शेतकऱ्यांत मोठी नाराजी आहे.त्यांना सन–२०१९ च्या म्हणजेच सुमारे सात वर्षापूर्वी प्रमाणे मोबदला भेटत असून तो त्यांच्यावर आर्थिकदृष्ट्या अन्याय करणारा ठरत आहे.त्यामुळे त्यांनी निळवंडे कालवा कृती समितीचे संस्थापक नानासाहेब जवरे यांच्या सहकार्याने शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ड.अजित काळे यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू केला होता.आता त्याची फळे त्यांना दृष्टिपथात आलेली दिसत असून त्याबाबत नुकतीच उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात संगमनेर तालुक्यातील मौजे वडझरी बुद्रुक,वडझरी खुर्द,तळेगांव दिघे,जुनेगांव,शहादतपुर,मिरपूर,आदी गावांसाठी सुनावणी संपन्न झाली आहे.त्यावेळी हा स्थगितीचा आदेश दिला आहे.

त्यात उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संगमनेर यांनी दिनांक १७ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ (४८ चा १९५६) च्या कलम ३ (जी) अन्वये अंतिम निवाडे घोषित केले होते.सदरचे घोषित केलेले अंतिम निवाडे हे शेतकऱ्यांकरीता नुकसानकारक असल्याचे उघड झाले होते.त्यात सदरचे निवाडे हे दिनांक २९ डिसेंबर २०२३ रोजी घोषित करण्यात आलेले असून शेतकऱ्यांना मात्र








त्यावेळेला प्रशासनाने निवाड्यात मंजूर केलेली मोबदला रक्कम दि.१३ मे २०२६ रोजीची निश्चित करून देयके देण्यासाठी नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.मात्र ३ वर्षाचे व्याज कायद्याने देणे बंधनकारक असताना त्याला कोलदांडा घातला होता.सदर अंतिम निवाडे घोषित करतेवेळी प्रशासनाने महसूल व वनविभाग यांच्या वतीने दि.२४ जानेवारी २०२३ रोजी जारी करण्यात आलेला शासन आदेशाला अनुसरून अंतिम निवाडे केले होते.मात्र ड.साक्षी अजित काळे व ड.अजित काळे यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेनुसार सदर शासन आदेश हा आता रद्दबादल ठरविण्यात आला आहे.सदर दि.२४ जानेवारी २०२३ रोजीच्या शासन आदेशानुसार जमिनीची बाजारमूल्य किंमत ठरवितांना प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून लगतचे १ वर्ष सोडून मागील ३ वर्षाचा खरेदी–विक्री व्यवहार लक्षात घेण्याचे अन्यायकारक आदेशित करण्यात आले असताना संगमनेर येथील उपविभागीय अधिकारी यांनी मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल असून देखील निवाड्यात दुरुस्ती न करता जाणीवपूर्वक शेतकऱ्यांचा आर्थिक नुकसान होण्यासाठी निवाडे घोषित केले असल्याचे गंभीर बाब उघड केली होती.तसेच मोठ्या किंमतीचे मूळ गावातील तसेच लगतच्या गावांमधील खरेदी–विक्री व्यवहार वगळून जमिनीचा बाजारमूल्य कमी ठरवून नुकसान भरपाई दिली असल्याचे उघड झाले होते.त्यामुळे या दुष्काळी शेतकऱ्यांनी ड.अजित काळे यांचे मार्फत मुबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून दाद मागण्याचा निर्णय घेतला होता.

त्यावेळी ड.अजित काळे व ड.साक्षी काळे यांनी जोरदार युक्तिवाद करत न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रशासनाने केलेले अंतिम निवाडे हे चुकीच्या पद्धतीचे बेकायदेशीर आहे व शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक आहे. तसेच सदरहू निवाडे नव्याने दुरुस्त करून घोषित करावे,सदर निवाडे तयार करतेवेळी आजच्या येणाऱ्या बाजारमूल्य प्रमाणे नव्याने परिमाणित करून शेतकऱ्यांना व्याजासहित मोबदला द्यावा अशी मागणी केली होती. हा युक्तिवाद मान्य करत मुंबई उच्च न्यायालयाने भूसंपादन अधिकाऱ्यांनी घोषित केलेले मौजे वडझरी बुद्रुक, तळेगांव दिघे,मिरपूर इत्यादी गावांकरीता जाहीर व अंतिम निवाड्यांवर स्थगिती दिली आहे.परिणामी शेतकऱ्यांच्या न्यायाचा मार्ग मोकळा झाला आहे.त्यांनी ड.काळे,ड.साक्षी काळे, आदींना धन्यवाद दिले आहे.

# महायुती सरकारचे आभार; साकळाई योजनेच्या ९६७ कोटींच्या कामाचे टेंडर प्रसिद्ध

## श्रीगोंदा-अहिल्यानगर तालुक्यातील ३२ गावांतील सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार : डॉ. सुजय विखे पाटील

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

नगर-अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेतील साकळाई उपसा सिंचन योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला आता वेग आला आहे. दीर्घकाळ कागदोपत्री प्रक्रिया, आश्वासने आणि प्रशासकीय अडथळ्यांमध्ये रखडलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेचे ९६७ कोटी रुपयांचे टेंडर प्रसिद्ध झाले आहे. पुढील दोन ते तीन महिन्यांत टेंडर प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता असून, सर्व प्रक्रिया मार्गी लागल्यास दिवाळीच्या मुहूर्तावर योजनेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात

होईल अशी माहिती डॉ सुजय विखे पाटील यांनी दिली.

या योजनेमुळे अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील ३२ जिरायती गावांमधील सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे दुष्काळी भागातील शेतीला शाश्वत पाण्याचा आधार मिळण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीतही बदल होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर निर्णायक टप्पा

साकळाई योजनेची मुहूर्तमेढ पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांनी रोवली होती. जिरायती भागातील शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा मिळावी, दुष्काळी गावांचा कायापालट व्हावा आणि शेतीला शाश्वत पाण्याचा आधार मिळावा, या उद्देशातून या योजनेची संकल्पना पुढे आली. मात्र अनेक वर्षे सरकारे आणि लोकप्रतिनिधी बदलत राहिले तरी योजनेचा प्रश्न मार्गी लागत नव्हता. प्रत्येक निवडणुकीत साकळाईचा मुद्दा चर्चेत येत होता; मात्र निवडणुकीनंतर प्रक्रिया पुन्हा संथ होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती.

२०२२ नंतर या योजनेच्या प्रक्रियेला निर्णायक गती मिळाली. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी साकळाईचा विषय सातत्याने शासन दरबारी लावून धरत अधिकाऱ्यांच्या बैठका, प्रस्तावांचा पाठपुरावा, तांत्रिक अडचणी आणि सर्वेक्षणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी प्रयत्न केले. २०२४ मध्ये योजनेचे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर योजनेला प्रत्यक्ष आकार मिळण्याची आशा निर्माण झाली. तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचा अडथळा दूर

सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर योजनेसमोरील महत्त्वाचा प्रश्न होता तो पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचा. हा प्रश्न प्रलंबित राहिल्याने योजनेच्या पुढील प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांमध्ये पुन्हा संभ्रम निर्माण झाला होता. २०२४-२५ मध्ये जलसंपदा विभागाची जबाबदारी राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आल्यानंतर साकळाई योजनेच्या प्रक्रियेला पुन्हा वेग मिळाला. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका घेत योजनेतील अडथळे दूर करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता आणि १,२३४ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाल्याने योजनेच्या पुढील प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला.

आता ९६७ कोटींच्या कामाचे टेंडर

साकळाई उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी ९६७ कोटी रुपयांचे टेंडर प्रसिद्ध झाल्याने योजनेने आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने पाऊल टाकले आहे. पुढील दोन ते तीन महिन्यांत टेंडर प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे. वनविभागासह अन्य संबंधित विभागांच्या आवश्यक मान्यतांसाठीही मागील महिन्यात टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. टेंडर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दिवाळीच्या मुहूर्तावर प्रत्यक्ष कामाचा श्रीगणेशा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून साकळाई योजनेच्या प्रत्यक्ष कामाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अतिरिक्त पाण्यातून दुष्काळी भागाला दिलासा

१९५४ मध्ये घोड धरणासाठी केंद्रीय जल आयोगाने १०.४० टीएमसी पाणी साठ्याला मंजुरी दिली होती. मात्र प्रत्यक्षात धरणाची क्षमता ७.४० टीएमसी इतकी बांधण्यात आली. परिणामी दरवर्षी सुमारे तीन ते चार टीएमसी पाणी ओव्हरफ्लोच्या स्वरूपात वाहून जाते. या अतिरिक्त पाण्यापैकी १.८० टीएमसी पाणी साकळाई योजनेसाठी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आहे.

साकळाईच्या वाटचालीतील महत्त्वाच्या घडामोडी

साकळाई योजनेचा इतिहास पाहता या मागणीसाठी अनेक वर्षे आंदोलने, निवेदने आणि बैठका झाल्या. प्रत्येक निवडणुकीत योजनेचा मुद्दा ऐरणीवर आला; मात्र प्रत्यक्ष काम सुरू झाले नव्हते.माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी खासदारकीच्या काळात सर्वे क्षण पूर्ण करून घेणे, प्रशासकीय पातळीवरील अडथळे दूर करणे आणि प्रस्तावाला गती देण्यासाठी पाठपुरावा केला. त्यानंतर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, शासन मान्यता आणि निधी मंजुरीच्या प्रक्रियेला गती दिली.या प्रक्रियेत माजी मंत्री बबनराव पाचपुते, स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले, विद्यमान आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार अक्षय कर्डिले यांनी सहकार्याची भूमिका घेतली.

३२ जिरायती गावांना लाभ

साकळाई उपसा सिंचन योजनेचा लाभ अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील ३२ जिरायती गावांना अपेक्षित आहे. यामध्ये चिखली, कोरेगाव, घोसपुरी, सारोळा कासार, खडकी, जाधववाडी,



वाळकी, शिरढोण, हिवरे झरे, बाबुर्डी बेंड, दहिगाव, साकत, वाटेफळ, देऊळगाव सिद्धी, तांदळी, बडगाव, रुई छत्तीसी, आंबिलवाडी, गुणवडी, गुंडेगाव, राळेगण, मांडवगण, मठ पिंप्री, हातवळण, खांडगाव, महांडूळवाडी, कोळगाव, सुरेगाव, घुटेवाडी, कोतुळ, बांगर्डा आणि कामठी या गावांचा समावेश आहे.

सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची अपेक्षा असल्याने साकळाई योजना पूर्ण झाल्यास या भागातील शेतीच्या चित्रात मोठा बदल होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या साकळाईच्या मागणीला आता प्रत्यक्ष कामाच्या रूपाने दिशा मिळते का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. साकळाई उपसा सिंचन योजनेला मिळालेल्या मंजुरी आणि पुढील प्रक्रियेला गती मिळाल्याबद्दल माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

# खा. लंके यांच्या मध्यस्थीने पठारेंचे उपोषण मागे

पारनेर (समर्थ गांवकरी)

- पारनेरच्या पाणी योजनेला आता मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाची प्रतीक्षा
- नगरपंचायतीच्या लेखी आश्वासनानंतर चार दिवसांच्या आंदोलनाची सांगता
- तोडगा न निघाल्यास मुंबईत आंदोलनाचा खासदार लंके यांचा इशारा



पारनेर शहराला कायमस्वरूपी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी मुळा धरणाच्या बॅकवॉटरमधून प्रस्तावित करण्यात आलेली पाणीपुरवठा योजना तातडीने मंजूर करून प्रत्यक्ष काम सुरू करावे, या मागणीसाठी आमरण उपोषण करणारे मार्तंडनाना पठारे विचार मंचाचे अध्यक्ष दीपक पठारे यांनी चार दिवसांनंतर शुक्रवारी (ता. २१) उपोषण मागे घेतले. खासदार नीलेश लंके यांनी उपोषणस्थळी भेट देऊन मध्यस्थी केल्यानंतर आणि पारनेर नगरपंचायतीच्या वतीने लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनाची सांगता झाली.

नगरपंचायतीचे हे लेखी आश्वासन खासदार लंके यांच्या हस्ते पठारे यांना देण्यात आले.

पाणी योजनेच्या मंजुरीसाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असून, फाइल कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे, याची माहिती दोन दिवसांत देण्यात येईल, असे नगरपंचायतीने पत्राद्वारे स्पष्ट केले आहे. त्यामुळे चार दिवसांच्या उपोषणानंतर आंदोलनाला तूर्त विराम मिळाला असला तरी पाणी योजनेच्या प्रत्यक्ष मंजुरीकडे आता पारनेरकरांचे लक्ष लागले आहे.

पारनेर शहरासाठी मुळा धरणाच्या बॅकवॉटरमधून पाणी आणून कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्याची योजना प्रस्तावित आहे. या योजनेसाठी सर्वेक्षण करण्यात आले असून, तांत्रिक मंजुरीसाठी ७२ लाख ८७ हजार २७७ रुपये शासनाच्या कोषागारात जमा करण्यात आले आहेत. मात्र, दोन वर्षांपासून प्रस्ताव पुढील मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याने योजनेचे प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. खासदार नीलेश लंके यांनी सांगितले की, पारनेर शहराची पाणी योजना हा पारनेरकरांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. शाश्वत पाणीपुरवठ्यासाठी पाणीपुरवठा समितीचे सभापती योगेश मते तसेच नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी सर्वे क्षण करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली आहे. तांत्रिक मंजुरीसाठी मोठी रक्कम शासनाच्या कोषागारात जमा करूनही योजना दोन वर्षांपासून प्रलंबित आहे.

पारनेरच्या पाणी योजनेसोबत राज्यातील इतर पाणी योजनांना मंजुरी मिळाली असताना पारनेर शहराची योजना मात्र प्रलंबित ठेवण्यात आल्याचा आरोप लंके यांनी केला. राजकीय कुरघोडीतून ही योजना रखडल्याचे त्यांनी म्हटले.

पारनेरकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा राजकारणाचा विषय होऊ नये. शहराला शाश्वत पाणी मिळण्यासाठी ही योजना तातडीने मार्गी लागणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत,असे लंके यांनी स्पष्ट केले.

रखडलेल्या पाणी योजनेचा विषय राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे लंके यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पारनेर नगरपंचायतीचे पदाधिकारी आणि उपोषणकर्ते यांची संयुक्त बैठक घेण्याबाबत शरद पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# सागरी चाच्यांचा धुमाकूळ, २२ भारतीयांसह ३० जणांचे अपहरण

## येमेन आणि सोमालियाच्या समुद्रातील धक्कादायक घटना

येमेन/नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

येमेन आणि सोमालियाच्या किनाऱ्याजवळ घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये सागरी चाच्यांनी दोन व्यावसायिक जहाजांचे अपहरण केले. या दोन्ही जहाजांवर एकूण २२ भारतीय नागरिकांसह ३० क्रू सदस्य होते. एमटी सिबू १ वर १६, तर एम/व्ही लुटुफवर सहा भारतीय नागरिक होते. सोमालियाजवळ अपहरण करण्यात आलेल्या जहाजावर तुर्कियेची शस्त्रे तसेच दळणवळण आणि उपग्रह उपकरणे होती. दरम्यान, एम/व्ही लुटुफ आणि त्यावरील क्रू सदस्यांची सध्याची स्थिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

शिपिंग मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, २० ऑगस्ट रोजी येमेनच्या किनाऱ्यापासून सुमारे ३० नॉटिकल मैल अंतरावर एडनच्या आखातात एरिट्रियाच्या ध्वजाखालील तेल उत्पादने वाहून नेणारे टँकर एमटी सिबू १ सशस्त्र सागरी चाच्यांनी ताब्यात घेतले. या जहाजावर एकूण २० क्रू सदस्य होते, त्यापैकी १६ भारतीय नागरिक होते. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या घटनेनंतर भारतीय यंत्रणा परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. प्राथमिक माहितीनुसार, जहाजावरील भारतीय क्रू सदस्य सुरक्षित आहेत.

दुसरी घटना १७ ऑगस्ट रोजी सोमालियाच्या पुंटलँड किनाऱ्याजवळ घडली. येथे कॅमेरूनच्या ध्वजाखालील मालवाहू जहाज एम/व्ही लुटुफचे समुद्री चाच्यांनी अपहरण केले. या जहाजावर १० सदस्यांचा क्रू होता. त्यामध्ये सहा भारतीय नागरिक, तुर्कियेचा एक नागरिक, जॉर्जियाचा एक नागरिक आणि सर्बियाचे दोन सुरक्षा रक्षक होते. सोमाली अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या जहाजाची मालकी पोलर मूव्हमेंट शिपिंगकडे असल्याचे सांगण्यात येते. अपहरण केल्यानंतर सागरी चाच्यांनी हे जहाज पुंटलँडमधील नुगाल किनाऱ्याच्या दिशेने नेले.

# आसामच्या पाच जिल्ह्यांना पुराचा तडाखा

गुवाहाटी/नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

आसाममध्ये पाच जिल्ह्यांतील ९२ गावांमधील १४ हजार ७९९ नागरिकांना पुराचा जबर तडाखा बसला आहे. नद्यांची पाणी पातळी हळू हळू ओसरत आहे पण अनेकांना अद्याप घरी जाणे शक्य झालेले नाही. जे पुन्हा घरी पोहोचले आहेत ते हळू हळू आपली घरे स्वच्छ करून संसार पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करत आहेत. शेतीचे पुरामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. पाणी पूर्ण ओसरल्यानंर शेतजमिनीच्या स्थितीचा नेमका अंदाज येईल.

पूरग्रस्तांचे जीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. प्रभावित नागरिक आपली घरे आणि शेती पुन्हा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मुख्यमंत्री डॉ. हिमंत बिस्व सरमा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन राज्यातील पुरामुळे झालेल्या जीवित व वित्तहानीची तसेच सुरू असलेल्या मदत आणि पुनर्वसन अभियानाची सविस्तर माहिती दिली.

आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या २० ऑगस्टच्या आकडेवारीनुसार आता सर्व नद्या धोक्याच्या पातळीखाली वाहत आहेत. आतापर्यंत १०६ जणांचा मृत्यू झाला आहे. पुरामुळे सर्वाधिक नुकसान शिवसागर, चराईदेव, जोरहाट आणि गोलाघाट जिल्ह्यांमध्ये झाले आहे. राज्यात ३,०८३ हेक्टर कृषी जमीन पाण्याखाली आहे. सध्या मदत छावण्यांमध्ये २३८ जणांनी आश्रय घेतला आहे. मदत वितरण केंद्रांवर १,१६५ छावणीबाहेरील रहिवाशांना मदत मिळत आहे. प्रभावित भागांमध्ये गुरुवारी राज्य सरकारने ४ वैद्यकीय पथके तैनात केली. सरकारी अधिकारी नुकसानीचे आकलन करण्यात व्यस्त आहेत.

# शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्पामुळे राज्यात परिवर्तन घडेल : कृषीमंत्री दतात्रय भरणे

मुंबई (समर्थ गांवकरी)

कृषीमंत्री दतात्रय भरणे म्हणाले की, 'शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्पामुळे राज्यात परिवर्तन घडेल. एआय आधारित शेतीसाठी शासनाचा आग्रह असून हा प्रकल्प राज्यव्यापी राबविण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रकल्पामुळे शेतीच्या विकासाला चालना मिळेल : प्रताप पवार

सकाळ समुहाचे अध्यक्ष प्रताप पवार म्हणाले की, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी 'शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्प राबविण्याचा घेतलेला निर्णय हा राज्याच्या विकासासाठी अत्यंत महत्वाचा आहे. शासनाच्या पाठिंब्यांशिवाय कोणताही प्रकल्प यशस्वी होवू शकत नाही.या प्रकल्पामुळे शेतीच्या विकासाला चालना मिळेल व महाराष्ट्राच्या विकासासाठी हातभार लागेल असेही ते म्हणाले.

एआय आधारित उपायांमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यास मदत होईल : निलेश नलवडे

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलवडे यांनी शेतीतील आव्हाने आणि बारामती येथील ग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टने कापूस,सोयाबीन,तूर,ऊस,संत्रे ,हळद,कांदा या पिकनिहाय विकसित केलेल्या 'एआय' आधारित शेतीतील पिकांची उत्पादकता वाढविण्याचा राज्याचा प्रकल्पाचे सा दरीकरण केले. एआय आधारित ऊस शेतीच्या प्रायोगिक वापरात उत्पादनवाढीचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. २०० शेतकऱ्यांच्या नोंदींपैकी १६४ वैध नोंदींमध्ये प्रारंभिक सरासरी उत्पादन ६५.४५ टन प्रति एकर, तर अंतिम सरासरी उत्पादन ७३.१२ टन प्रति एकर नोंदविण्यात आले. सरासरी उत्पादनवाढ १७.६६ टन प्रति एकर वाढली आहे. 'एआय' आधारित सिंचन व्यवस्थापनामुळे सरासरी ४२ टक्के पाणी बचतीची नोंद करण्यात आली असून, प्रति हेक्टर प्रतिदिन सुमारे ९०००० हजार लिटर पाण्याची बचत होऊ शकते.ड्रोनच्या माध्यमातून घेतलेल्या पिकांच्या प्रतिमांचे एआय आणि मशीन लर्निंगच्या सहाय्याने विश्लेषण करून कीड व रोगांचा प्रारंभिक टप्प्यात शोध घेता येणार आहे.त्यानुसार सिंचन आणि फवारणीचे नियोजन करण्यासाठी संबंधित माहिती थेट शेतकऱ्यांच्या मोबाईलवर उपलब्ध करून देण्याची संकल्पना आहे.एआय आधारित शेतीच्या अंमलबजावणीत सध्या १० हजारांहून अधिक शेतकऱ्यांना चांगला अनुभव आला आहे.प्रकल्पाचा राज्यात येणारा खर्च हा पिकनिहाय सादर करण्यात आला. राज्यात पिकाचा करण्यात येणारा विस्तार याबाबतीत माहिती सादर करण्यात आली.

# माती आणि पाणी संवर्धन ही काळाची गरज : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

## मृद व जलसंधारण विभागातर्फे 'महा वॉकेथॉन - वॉक फॉर वॉटर'चे आयोजन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

माती आणि पाणी ही आपली अमूल्य नैसर्गिक संपत्ती असून त्यांचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा दिलेला संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरत आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी जलसुरक्षित आणि समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी माती व पाणी संवर्धनाची लोकचळवळ उभी करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने माती व पाणी संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित 'महा वॉक्थॉन - वॉक फॉर वॉटर' उपक्रमात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया बोलत होते. यावेळी महापौर श्रीमती ज्योती गाडे, नगरसेवक श्री ऋग्वेध गंधे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, उपवनसंरक्षक श्री सालविठ्ठल, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मुळीक, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. खुरांगे, माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती गायकवाड, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी चित्रकला, निबंध तसेच वादविवाद स्पर्धेचे बक्षिस वितरण देखील यावेळी उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, आज आपण पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविला, तरच उद्याची पिढी सुरक्षित राहील. त्यामुळे माती आणि पाणी संवर्धनाचा संदेश केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता तो आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवूया, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी यावेळी केले.

'वॉक फॉर वॉटर' या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जलसंधारण, पाणी बचत, मृदसंधारण आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सहभागी नागरिकांनी माती व पाणी संवर्धनाचे संदेश देणारे फलक हातात घेत जनजागृती केली. पाण्याचा अपव्यय टाळणे, पावसाचे पाणी साठवणे, वृक्षलागवड करणे, जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि मातीची धूप रोखणे याबाबत नागरिकांना संदेश देण्यात आले. कार्यक्रमाच्या माध्यमातून 'माती वाचवा, पाणी वाचवा आणि भविष्य सुरक्षित करा' हासंदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.


## ग्रामपंचायत कार्यालय साकिरवाडी, ता.अकोले, जि. अहिल्यानगर

### निविदा सुचना क्र. सन २०२६-२७

ग्रामपंचायत साकिरवाडी, ता. अकोलेच्या वतीने पेसा ५ % अबंध निधी योजना सन २०२३-२४ अंतर्गत खालील कामांच्या बी-१ निविदा दोन लिफाफा पद्धतीने योग्य त्या नोंदणीकृत मक्तेदारांकडून मागविणेत येत आहे. कामांबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केला असून कोरा निविदा संच दि.२२/०८/२०२६ सकाळी १० ते ३१/०८/२०२६ पर्यंत सकाळी ११.०० वाजेपर्यंत या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्ष भरणा करून उपलब्ध आहे. परीपूर्ण भरलेल्या निविदा वरील कालावधीतच सादर करणे बंधनकारक आहे. निविदा दि. ३१/०८/२०२६ रोजी शक्य झाल्यास सकाळी १२.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | निविदा फी | कामाची मुदत | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे साकिरवाडी येथे रस्ता काँक्रिटीकरण करणे, काळभोई (साकीरवाडी) अपूर्ण काम पूर्ण करणे. | पेसा ५ % अबंध निधी योजना २०२३-२४ | १५८३०१/- | १५८३/- | २००/- | ३ महिने | खुला |

**अटी व शर्ती :** १) उपरोक्त कामांबाबत निविदा अटी व शर्ती ई. बाबत सर्व तपशील संचामध्ये नमूद केलेला आहे. कोरा निविदा संच दि. २२/०८/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून ते दि. ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्षाने भरणा करून उपलब्ध आहे. २) परिपूर्णरित्या भरलेला निविदा संच ग्रामपंचायत कार्यालयात दि. २२/०८/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून ते दि. ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत वा त्यापूर्वी सादर करता येईल. ३) निविदा शक्य झाल्यास दि. ३१/८/२०२६ सकाळी १२.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील. ४) निविदा संदर्भात सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहाव्यास मिळेल. ५) निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीने राखून ठेवलेला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी          प्रशासक
ग्रामपंचायत कार्यालय साकिरवाडी, ता. अकोले, जि.अहिल्यानगर

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### नगरमध्ये पत्रकार सुशील थोरात यांच्यावर १५ ते २० जणांच्या टोळक्याचा भ्याड हल्ला



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर (स.गांवकरी):– साम टीव्ही न्यूज वाहिनीचे जिल्हा प्रतिनिधी सुशील थोरात यांच्यावर १५ ते २० जणांच्या टोळक्याने क्षुल्लक कारणावरून बेदम मारहाण केल्याची संतापजनक घटना अहिल्यानगरमध्ये घडली. सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोडवर एचडीएफसी बँकेजवळ हा प्रकार घडला. या हल्ल्यानंतर थोरात यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच शहरातील पत्रकारांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली. शहर विभागाचे उपअधीक्षक दिलीप टिपरसे आणि तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक बालाजी वैद्य यांनी रुग्णालयात धाव घेत घटनेची माहिती घेतली. दरम्यान, मारहाण करणाऱ्या काही संशयितांची नावे पोलिसांना समजली आहेत.

थोरात यांच्यावर झालेल्या या हल्ल्याचा पत्रकार संघटनांकडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे. शुक्रवारी पत्रकार

पदाधिकारी आणि सदस्य जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची भेट घेऊन आरोपींवर कडक कारवाईची मागणी करणार आहेत. विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही या घटनेचा निषेध नोंदवत शहरातील वाढत्या गुंडगिरीवर पोलिसांनी जरब बसवावी, अशी मागणी केली आहे.

### अयोध्या राम मंदिर देणगी प्रकरणात चंपत राय, अनिल मिश्रा निर्दोष

(समर्थ गांवकरी)



अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित देणगी चोरी प्रकरणाची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे माजी सरचिटणीस चंपत राय आणि माजी सदस्य अनिल मिश्रा यांना निर्दोष ठरवले आहे. एसआयटीने या प्रकरणाचा अंतिम अहवाल सादर केला आहे.

मंदिरातील व्यवस्थापन प्रक्रियेबाबत एसआयटीने चंपत राय आणि अनिल मिश्रा यांची चौकशी केली होती. गैरप्रकाराची माहिती मिळाल्यानंतर त्यावर कारवाई करण्यात आल्याचेही समोर आले. अंतिम अहवालानंतर दोघेही पुन्हा सक्रिय झाले असून विविध मान्यवरांच्या भेटीगाठी, बैठका तसेच संत–महंतांशी संवाद साधत आहेत.

दरम्यान, या प्रकरणात चंपत राय आणि अनिल मिश्रा यांना निर्दोष ठरविण्यात आल्याची माहिती 'संपर्क से समर्थन' अभियानांतर्गत भाजप अहिल्यानगर महानगर कार्यालयाचे मंत्री मुकुल गंधे यांनी देवगड देवस्थानचे महंत भास्करगिरी महाराज यांना दिली.

### कौशल्याला प्रमाणपत्राची जोड – मा.आ. डॉ.सुधीर तांबे



संगमनेर (समर्थ गांवकरी)

कौशल्याच्या जोरावर विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या मात्र औपचारिक शैक्षणिक प्रमाणपत्राअभावी रोजगाराच्या चांगल्या संधींपासून वंचित राहणाऱ्या कामगारांसाठी जयहिंद लोकचळवळ आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, राजापूर, ता. संगमनेर येथे परीक्षा पार पडली. संगमनेर तालुक्यातील १७९ उमेदवारांनी या परीक्षेस सहभाग नोंदविला. इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, मेकॅनिक, वायरमन, विणकाम, शिवणकाम, टेलरिंग आदी विविध क्षेत्रांत अनेक नागरिक आपल्या अनुभवातून आणि कौशल्यातून उत्तम काम करीत आहेत. मात्र, त्यांच्या कौशल्याला अधिकृत शैक्षणिक प्रमाणपत्राची जोड नसल्यामुळे रोजगाराच्या तसेच पुढील प्रगतीच्या अनेक संधींपासून त्यांना वंचित राहावे लागते. ही अडचण लक्षात घेऊन पूर्व शिक्षण मान्यता मूल्यांकन केंद्राच्या माध्यमातून कौशल्य आणि अनुभवाला शैक्षणिक मान्यता मिळवून देण्याचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

# विद्यार्थ्यांनी ज्ञानाची साधना करावी केवळ मार्कांची नाही : शिक्षण तज्ज्ञ संदीप वाकचौरे

अकोले (समर्थ गांवकरी)



विद्यार्थ्यांनी ज्ञानाची साधना करावी मार्कांची नाही असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ, व्याख्याते व जेष्ठ पत्रकार संदीप वाकचौरे यांनी केले.ते आनंदगड पॉलीटेक्निक कॉलेज येथे सुरू असलेल्या मार्गदर्शन कार्यशाळेत बदलत्या शिक्षणापुढील आव्हाने या विषयावर बोलत होते.

आंतरभारती रुलर इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये शैक्षणिक वर्ष २०२६–२७ प्रथम वर्ष नूतन प्रवेशित विद्यार्थी स्वागत समारंभ व त्याचे औचित्य साधून आयोजित क्रीडा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, तज्ज्ञ मार्गदर्शन कार्यशाळा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पॉलिटेक्निक कॉलेजचे समन्वयक विद्याचंद्र सातपुते हे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ .अनिल रहाणे,प्राचार्य विनोद गिरी, कॅम्पस डायरेक्टर प्रा.संदीप थोरात यांसह मान्यवर उपस्थित होते.

पुढे मार्गदर्शन करताना श्री .संदीप वाकचौरे म्हणाले की ,पदवी बरोबर ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. शिक्षणासमोरील आव्हाने लक्षात घेणे गरजेचे आहे.

स्वभाषेतून शिक्षणाला प्राधान्य दिले जायला आहे. संशोधन करणे ,मोबाईल वरील माहितीची सत्यता तपासणे ,विद्यार्थ्यांना माणूस बनवणे ,प्रमाणिकपणा जपणे मुलांना मोठी स्वप्न पाहायला लावणे व पूर्तीसाठी प्रयत्न करावयाचे प्रेरणा निर्माण करणे, इतिहास समजून घेणे माहितीची उपासना करणे ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करणे. मार्क मिळवण्यापेक्षा पदवीसाठी आवश्यक असलेले कौशल्य आत्मसात करणे ही सगळ्यात मोठे शिक्षणासमोरील आव्हाने असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले . आपल्या हाती माहिती आणि तंत्रज्ञाने मोठ्या प्रमाणावर माहिती दिली आहे, पण त्या माहितीच्या पलीकडे विवेकशीलता आणि शहाणपण या वाटेने चालण्यासाठी शिक्षणातून प्रयत्न होण्याची गरज आहे. विद्यापीठांनी पदवी दिली म्हणजे आपण ज्ञानी झालो असे घडत नाही .यासाठी साधना अखंड जीवनभर करावी लागते .त्या साधनेतूनच आपल्याला एखाद्या विषयामध्ये तज्ज्ञता निर्माण करता येते.त्यामुळे जीवनभर ज्ञान साधनेची वाट निर्माण करण्यासाठीचे प्रयत्न पदवी आणि शिक्षणातून होण्याची गरज आहे. प्रसंगी यशवंतराव चव्हाण डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम आईन्स्टाईन यासारख्या थोर विचारवंतांची उदाहरणे देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्न स्वप्नपूर्तीसाठी अतोनात प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना को– ऑर्डिनेटर विद्याचंद्र सातपुते यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात कौशल्य प्राप्त करावी. कौशल्ये असतील तर नोकऱ्या तुमच्या मागे फिरतील अशा शब्दात विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले

सूत्रसंचालन विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी आंबरे व ज्ञानेश्वरी गोर्डे यांनी केले प्रास्ताविक प्राचार्य विनोद गिरी यांनी तर आभार प्रा. संदीप थोरात यांनी करतांना सर्व मार्गदर्शनाचा आढावा घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक व कर्मचारी विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानासाठी वाढीव जागेचा प्रस्ताव सादर करा : विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

मुंबई (समर्थ गांवकरी)

कल्याण पश्चिम येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या विकासासाठी उद्यानालगतची २ एकर जमीन उपलब्ध करून देण्यासाठी आरक्षण बदलाचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करावा, असे निर्देश अण्णा बनसोडे यांनी कल्याण–डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाला दिले. जागा उपलब्ध करून देण्याबाबत विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे बैठक झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या सुशोभीकरण व विकासासाठी वाढीव जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी उद्यानालगतची सुमारे २ एकर जमीन उद्यानाच्या विकासासाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आरक्षण बदलाचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या विकासाला गती मिळावी आणि स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत उद्यानाचे नियोजित सुशोभीकरण प्रभावीपणे पूर्ण व्हावे, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने आवश्यक कार्यवाही करावी, असेही निर्देश बैठकीत देण्यात आले. बैठकीस नगरविकास विभागाचे अधिकारी, कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेचे उपायुक्त, नगररचना अधिकारी तसेच आंबेडकरी चळवळीतील विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## विद्यालयाचे नवीन इमारत बांधकामाला घोडके दांपत्याकडून '१ लाख एकशे अकरा' ची देणगी

### अंतिम टप्प्यातील कामाला अनेक देणगीदारांकडून भरीव देणगी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



जय मल्हार विद्यालयाच्या च्या शाळेला पिंपळगाव रोठा गावचे दाम्पत्य खंडू बबन घोडके व संगीता खंडू घोडके यांनी शाळेच्या नवीन इमारत बांधकामाला रुपये १ लाख एकशे अकरा रुपये निधीचा धनादेश विद्यालयाला सुपूर्द केला.

खंडू घोडके हे नुकतेच ज.छ.ऋउ.पनवेल येथून सेवानिवृत्त झाले आहेत.त्या निमित्ताने सामाजिक सेवेचा भाग म्हणून विद्यालयाच्या बांधकामाला देणगी देत असल्याचे संगीता घोडके यांनी सांगितले.

शाळेच्या नवीन इमारत बांधकामातील संपूर्ण इलेक्ट्रिक फिटिंग काम स्वखर्चाने करून देण्याचे दातृत्व ग्रामस्थ गोरख जगताप. उद्योजक,पुणे यांनी जाहीर करून सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

शाळा इमारतीचे अंतिम टप्प्यातील बांधकामाला ग्रामस्थ देणगीदार यांनीही भरीव देणगी देऊन सहकार्य दिल्याबद्दल शाळेच्या प्रांगणात खंडू व संगीता घोडके देणगी (१००१०१/–रुपये), एसएससी. बॅच सन २०१५–१६ देणगी रुपये(३००११/–रुपये )व संभाजी शिंदे(देणगी (५५५५/–रुपये)यांचा सन्मान करण्यात आला. शाळा नवीन इमारतीच्या अंतिम टप्प्यातील बांधकामातील उर्वरित लादीकाम,प्लंबिंग,कंपाउंड वॉल,गेट,पाणीटाकी,कलर,सोलर,तिसरा मजरा हॉल,डिजिटल सुविधा इत्यादीसाठी निधीची आवश्यकता असल्याचे शाळेतर्फे देणगीदारांना आवाहन करण्यात आले आहे.संस्थेचा बचत खाते नंबर ५४१४७४७३३३,खऋछ उजअए –उइखछ०२८१८६० सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा ,कान्हूर पठार या खात्यावर ऑनलाईन देणगी जमा करण्याची सुद्धा उपलब्ध आहे.अधिक माहितीसाठी प्रभारी मुख्याध्यापक बी.आर. उंडे ९९२१९८३९१९, संस्थेचे सचिव ॲड.पांडुरंग गायकवाड ९८२२६२०१४२ यांच्याकडे संपर्क साधावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त नेल आर्ट प्रशिक्षण वर्गास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### स्मार्ट दिसण्यासाठी नेल आर्ट उपयुक्त : अनुजा कांबळे



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने बागडपट्टी येथील जिव्हेश्वर भवन येथे सर्वांसाठी मोफत नेल आर्ट प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. या वर्गाला महिलांचा आणि युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, सचिव विजय मानकर, उत्सव समितीचे अध्यक्ष नीरज चांगटे, महेश कांबळे आदींसह

श्रीमती छाया साळी, सौ.वनिता पाटेकर,सौ. सुरेखा शेकटकर,सौ.दिपाली कांबळे,सौ.माधुरी खडामकर,

सौ.अनुजा कांबळे, सौ.वैशाली येवलेकर, सौ.पल्लवी कनोरे,सौ.शुभदा वल्ली,सौ.शैला मानकर, सौ.स्वाती बागडे,सौ.स्नेहा पाठक,श्रीमती अनुराधा मिसाळ, कु.ऋतुजा धोत्रे आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मेकअप प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

### महिलांचे प्रशिक्षण व सक्षमीकरण हाच उद्देश : विक्रम पाठक

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवा निमित्त स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ आणि भगवान जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट यांच्या संयुक्त विद्यमाने बागडपट्टी येथील जिव्हेश्वर भवन येथे सर्वांसाठी मोफत मेकअप प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.

महिला सक्षमीकरण हाच उद्देश

यावेळी बोलताना स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक म्हणाले, महिलांचे सबलीकरण व्हावे या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या शिबिरात आधुनिक पद्धतीने मेकअप कसा करावा याचे व्यावहारिक मार्गदर्शन देण्यात आले.महिला सक्षमीकरण ही आजच्या काळाची गरज आहे.

प्रशिक्षणात काय शिकवले?

आजच्या काळात महिला आणि युवतींचा कल स्मार्ट आणि आकर्षक दिसण्याकडे आहे.आपले व्यक्तिमत्व अधिक उठून दिसण्यासाठी मेकअप महत्त्वाचा ठरतो.

या पार्श्वभूमीवर युवा मेकअप आर्टिस्ट नक्षत्रा कांबळे यांनी प्रशिक्षण दिले. त्यांनी प्रोफेशनल मेकअप स्वतः कसा करावा,स्किन आणि पर्सनॅलिटीनुसार मेकअप, ड्रेपिंग, हेअर केअर तसेच काही खास मेकअप मॅजिक टिप्स याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

उद्घाटन आणि उपस्थिती

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, उत्सव समिती प्रमुख नीरज चांगटे,योगेश भागवत,महेश कांबळे यांच्यासह श्रीमती छाया विलास साळी,सौ. वनिता पाटेकर,सौ.सुरेखा शेकटकर, सौ. शुभदा वल्ली, सौ.अनुजा कांबळे,श्रीमती अनुराधा मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# धरण स्थळावर जाऊन विद्यार्थ्यांनी घेतला जलसंपदेचा धडा !

अकोले (समर्थ गांवकरी)

देवठाण येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी आढळा नदीवरील देवठाण धरणस्थळाला भेट देत आढळा नदी, धरणाची माहिती घेतली. धरणाची गरज व रचना, धरणाचे बांधकाम, धरणातून पाणी कसे सोडले जाते, डाव्या व उजव्या कालव्यातून पाणी वितरण कसे केले जाते... या बाबी समजून घेतल्या. शेतीला पाणी देण्याची संपूर्ण प्रणाली समजून घेताना भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील महत्त्वाचा धडा प्रत्यक्ष धरणस्थळावर जाऊन शिकण्याची, अनुभवण्याची संधी विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीच्या निमित्ताने मिळाली.

या क्षेत्रभेटीत विद्यार्थ्यांना आढळा नदीचा उगम, तिचा प्रवास, नदीकाठची गावे, सावरगाव पाट येथील प्रसिद्ध तव्याचा धबधबा तसेच आढळा नदीवरील सांगवी व देवठाण धरणांची माहिती जलसंपदा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दिली. धरण कधी बांधण्यात आले, मातीचे धरण कसे उभारले जाते, धरणासाठी जागेची निवड कशी केली जाते, याबाबतही मुलांना समजेल अशा भाषेत मार्गदर्शन करण्यात आले. पर्जन्यमापकाबद्दल माहिती देण्यात आली. नदी, धरण, कालवे अशी पाठ्यपुस्तकात वाचलेली माहिती डोळ्यांसमोर प्रत्यक्ष उभी राहिल्याने विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला नवी दिशा मिळाली आणि शिकण्याचा अनुभव अधिक आनंददायी, परिणामकारक आणि अर्थपूर्ण झाला.

सध्या आढळा धरणातून पाणी सोडण्यात येत असल्याने चाक फिरवून पाणी सोडण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहता आली. कालवा निरीक्षक अंकुश कडलग यांनी विद्यार्थ्यांना पाणी सोडण्याच्या यंत्रणेजवळ नेऊन चाक हाताने फिरवून पाणी सोडण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. डावा व उजवा कालवा, त्यातून शेतीसाठी पाण्याचे वितरण कसे केले जाते, याची माहितीही त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. पाण्याचा एक प्रवाह धरणापासून निघून कालव्यातून कित्येक शेतांपर्यंत कसा पोहोचतो, याची साखळी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहता आली. वास्तविक देवठाण गावातील मुलांनी धरण नुसत्या डोळ्यांनी अनेकदा बघितलेले होते. मात्र बारकावे समजून घेतलेले नव्हते. तशी संधी त्यांना मिळालीच नव्हती. शाळेच्या क्षेत्रभेटीदरम्यान कालवा निरीक्षक कडलग यांनी सांगितलेली रंजक माहिती विद्यार्थी विलक्षण कुतूहलमिश्रित भावनेने ऐकत समजून घेत होते. कालवा चौकीदार रावसाहेब वाकचौरे आणि रामदास मेंगाळ यांनीही विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.

आढळा धरणाच्या पाण्यावर आधारित विविध पिण्याच्या पाणीपुरवठा योजना तसेच धरणातील पाण्यात केली जाणारी मासेमारी याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती मिळाली. त्यामुळे 'नदी', 'धरण', 'कालवा', 'सिंचन' आणि 'जलसंपदा' हे पाठ्यपुस्तकातील विषय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे अर्थपूर्ण आणि आनंददायी पद्धतीने शिकता आले.

शैक्षणिक उपक्रमासोबतच रानावनात हिंडत विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीचा मनमुराद आनंदही लुटला. हिरवाईने नटलेल्या निसर्गाच्या विराट उद्यानात ऊन पावसाचा खेळ सुरू होता. अधूनमधून बरसणाऱ्या श्रावणाच्या सरी, धरण परिसरातील निसर्गरम्य वातावरण आणि भन्नाट वारा अशा रानभैरी माहोलात विद्यार्थ्यांनी गाणी सादर केली. हिंदी आणि मराठी गाण्यांच्या तालावर मुलांची पावले थिरकू लागली. विद्यार्थ्यांनी नृत्याचा मनमुराद आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांनाही नृत्यात सहभागी होण्यासाठी लाडिक आग्रह केला आणि शिक्षकांनीही मुलांच्या आनंदात सहभागी होत नृत्य केले.



बालपणातील असे अनुभव केवळ त्या दिवसापुरते मर्यादित राहत नाहीत. प्रत्यक्ष पाहणे, प्रश्न विचारणे, निरीक्षण करणे, अनुभवणे आणि त्या अनुभवावर विचार करणे, यातून मुलांचे शिकणे अधिक समृद्ध होते. आनंदातून शिकलेली गोष्ट मनात अधिक काळ टिकते. या क्षेत्रभेटीतही विद्यार्थ्यांनी जलसंपदेचा धडा केवळ ऐकला नाही, तर तो डोळ्यांनी पाहिला, अनुभवला आणि आनंदाने शिकला. असा क्षेत्रभेटी विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने समृद्ध करत असतात.

**– अनिल गायकवाड, विस्तार अधिकारी (शिक्षण)**

पाठ्यपुस्तकातील धडा प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेतल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला अनुभवाची जोड मिळाली. चार भिंतींच्या वर्गाबाहेर, निसर्गाच्या सान्निध्यात, नदी आणि धरणाच्या काठावर शिकलेला हा 'धरणाचा धडा' विद्यार्थ्यांच्या कायम स्मरणात राहील.

**– डॉ. अशोक काळे**
**अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती, देवठाण.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# अवैध दारू, नादुरुस्त रस्ते अन् जलजीवन मिशनच्या निकृष्ट कामांविरोधात ब्राम्हणवाड्यात आंदोलनाचा एल्गार!

## ब्राम्हणवाड्यातील विविध प्रश्नांवर ग्रामस्थ आक्रमक; २४ ऑगस्टला रास्ता रोको व आमरण उपोषण!

**ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावातील अवैध दारू विक्री, नादुरुस्त रस्ते, अपूर्ण व निकृष्ट रस्त्यांची कामे तसेच जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या अपूर्ण कामांविरोधात ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या विविध प्रश्नांबाबत ग्रामस्थांनी तहसीलदार अकोले यांच्याकडे निवेदन देऊन तातडीने ठोस कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. मागण्यांवर प्रशासनाकडून ठोस कार्यवाही न झाल्यास सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता ब्राम्हणवाडा मुख्य चौक बाजारपेठ रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन तसेच आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

गावातील अवैद्य दारूमुळे सामाजिक वातावरण बिघडत असून महिला, युवक आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अवैध दारू विक्रीबाबत संबंधित विभागांना वारंवार माहिती देऊनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी साईनाथ गायकर या युवकाचा मृत्यू झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण असून, या मृत्यूची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ब्राम्हणवाडा–बोटा तसेच ओतूर–ब्राम्हणवाडा रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे विद्यार्थी, शेतकरी, वाहनधारक आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच मुक्तादेवी ते हाळ, शिंदेमाथा ते येळ शेत आणि ब्राम्हणवाडा ते वनकुटे या रस्त्यांची कामे दीर्घकाळापासून अपूर्ण असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित रस्त्यांची तातडीने पाहणी करून अपूर्ण कामे पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**जलजीवन मिशनच्या कामाची चौकशी करण्याची मागणी:**

जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या ब्राम्हणवाडा प्रादेशिक नळ योजनेचे काम अपूर्ण असून काही ठिकाणी कामाचा दर्जा निकृष्ट असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या आहेत. संबंधित अभियंते व अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी तक्रारी करूनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. सदर योजनेची प्रत्यक्ष पाहणी करून अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत, निकृष्ट कामांची चौकशी करावी तसेच दोषी ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**तहसीलदारांकडून संबंधित विभागांना सूचना:**

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, अकोले यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच प्रस्तावित आंदोलनाच्या ठिकाणी उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रास्ता रोको व बेमुदत उपोषणाऐवजी विधायक मार्गाचा अवलंब करण्याचे आवाहनही तहसीलदार कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

**परिसरातील गावांनी आंदोलनात सहभागी व्हावे : सुभाष गायकर**

ग्रामपंचायत ब्राम्हणवाड्याचे उपसरपंच तथा विद्यमान प्रशासकीय समिती सदस्य सुभाष रामचंद्र गायकर यांनी परिसरातील गावांतील नागरिकांना आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. ब्राम्हणवाड्यासह परिसरातील अनेक गावांना खराब रस्ते, अपूर्ण विकासकामे, पाणीपुरवठ्याच्या समस्या आणि अवैध दारू विक्रीचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी परिसरातील सर्व गावांनी एकजुटीने ब्राम्हणवाड्यात होणाऱ्या आंदोलनात उपस्थित राहावे, असे आवाहन गायकर यांनी केले आहे.

प्रशासनाकडून मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्यास सुभाष रामचंद्र गायकर, शिवाजी नाथा आरोटे आणि पत्रकार संजय भाऊ गायकर हे तिघे दि. २४ ऑगस्टपासून आमरण उपोषण करणार आहेत. या




आंदोलनाला समस्त ग्रामस्थ ब्राम्हणवाडा तसेच परिसरातील नागरिकांचा पाठिंबा मिळत असल्याचे सांगण्यात आले आहे.

आंदोलनाचे ठिकाण : ब्राम्हणवाडा मुख्य चौक, बाजारपेठ रस्ता
दिनांक : सोमवार, २४ ऑगस्ट २०२६
वेळ : सकाळी ९ वाजता

**उपोषणकर्ते :**

१) सुभाष रामचंद्र गायकर – उपसरपंच, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा व विद्यमान प्रशासकीय समिती सदस्य

२) शिवाजी नाथा आरोटे – ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा, विद्यमान प्रशासकीय समिती सदस्य

३) संजय भाऊ गायकर – पत्रकार, दैनिक समर्थ गांवकरी व ग्रामस्थ

प्रशासनाने आंदोलनाची वेळ येण्यापूर्वीच संबंधित विभागांच्या माध्यमातून सर्व मागण्यांवर ठोस कार्यवाही करावी आणि ग्रामस्थांच्या समस्या मार्गी लावाव्यात, अशी मागणी होत आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### उत्तमराव भिमाजी देशमुख यांचे दुःखद निधन

**अकोले (समर्थ गांवकरी)**



कै. उत्तमराव भिमाजी देशमुख, सेवानिवृत्त तालुका पंचायत अधिकारी पंचायत समिती अकोले व माजी प्रशासक ग्रामपंचायत अकोले ,धुमाळवाडी, नवलेवाडी, राजूर यांचे मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी दुःखद निधन झाले .

त्यांच्या निधनाने संपूर्ण देशमुख कुटुंबीय व नातेवाईकांना दुःख झाले आहे. त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती परमेश्वर देवो ही सदिच्छा. कै. उत्तमराव देशमुख यांनी ११वी मॉडर्न हायस्कूल मधून पूर्ण केले.त्यानंतर त्यानी पुणतांबा येथे कृषी सहायक कोर्स पूर्ण केला . त्यांनी कृषी सहायक, महाराष्ट्र शासन म्हणून १९६३ ते १९७५ या कालावधीत कोपरगाव व नेवासा या ठिकाणी सेवा केली.

### आंदोलनानंतर अखेर अवसरी खुर्द येथील मातोश्री वसतिगृहात पाणी; प्रशासनाची धावपळ



**मंचर (समर्थ गांवकरी)**

अवसरी खुर्द ता.आंबेगाव येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मातोश्री मुलींच्या वसतिगृहातील पाणीपुरवठा रविवारपासून खंडित झाल्याने संतप्त विद्यार्थिनींनी गुरुवार दि.२० रोजी सायंकाळी रिकाम्या बादल्या घेऊन प्रशासनासमोर ठिय्या आंदोलन केले होते. आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले असून, शुक्रवार दि.२१ रोजी दुपारी साडेतीन ते चारच्या सुमारास वसतिगृहातील पाणीपुरवठा सुरळीत झाला. मातोश्री वसतिगृहाच्या चार विभागांमध्ये सुमारे २१९ विद्यार्थिनी राहतात.यापूर्वीही पाणीपुरवठा अनियमित होत असल्याची तक्रार होती. दररोज दोन टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. मात्र, गुरुवारी टँकरच्या फेऱ्या उशिरा झाल्याने विद्यार्थिनींनी आंदोलन केले.तसेच जेवणावर बहिष्कार टाकला. प्रशासनाने दोन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले होते.शुक्रवारी सकाळी प्रशासनाने जेसीबी व कामगारांच्या मदतीने पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनमधील दोष शोधण्यास सुरुवात केली.पाइपमध्ये साचलेला कचरा तसेच झडपेमधील अडथळे काढून पाइपलाइन स्वच्छ करण्यात आली.त्यानंतर उच्च दाबाने पाण्याचा पुरवठा सुरू झाला.चांडोली खुर्द येथून सुमारे आठ किलोमीटर अंतरावरून महाविद्यालयाच्या पश्चिमेकडील मुख्य टाकीत पाणी आणले जाते. या टाकीची क्षमता चार लाख लिटर असून, येथून अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयाला पाणीपुरवठा केला जातो. विद्यार्थिनींच्या होस्टेलला पाणी कमी पडू दिले जाणार नाही,अशी ग्वाही संबंधित विभागाने दिली.

### मराठी–गुजराती साहित्यिक आदान–प्रदानातून 'नटसम्राट'चे गुजराती नाट्यरूपांतर

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या वतीने मराठी–गुजराती साहित्यिक व सांस्कृतिक आदान–प्रदानाला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) लिखित अजरामर मराठी नाटक 'नटसम्राट'चे गुजराती भाषेतील नाट्यरूपांतर प्रथमच रंगभूमीवर सादर करण्यात येणार आहे. या गुजराती अनुवादित नाटकाचा पहिला प्रयोग शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता लघु नाट्यगृह, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे होणार आहे. हा पहिला प्रयोग केवळ निमंत्रितांसाठी आयोजित करण्यात आला आहे. या विशेष उद्घाटन समारंभास सांस्कृतिक कार्य मंत्री ड आशिष शेलार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी तसेच पॉप्युलर प्रकाशनचे व्यवस्थापकीय संचालक रामदास भटकळ यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या नाट्यप्रयोगाचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

### 'आयपीएसओडब्ल्यूए'च्या पाठबळामुळे महिला बचत गटांना बाजारपेठेची संधी

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

इंडियन पोलीस सर्व्हिस ऑफिसर्स वाइव्ज असोसिएशन 'आयपीएसओडब्ल्यूए' यांच्या पुढाकाराने वरळी येथे आयोजित प्रदर्शन व विक्री उपक्रमामुळे विविध स्वयंसेवी संस्था, बचत गट आणि महिला उद्योजकांना आपली उत्पादने सादर करण्यासह त्यांची विक्री करण्याची संधी मिळाली. या उपक्रमातून बचत गटाच्या महिलांना उत्पादन विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत मिळाली आहे. प्रदर्शनात सहभागी महिला उद्योजकांनी एका दिवसात सुमारे २१ हजार रुपयांची उलाढाल केली. ग्राहकांकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल महिलांनी समाधान व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे महिलांना आर्थिक उत्पन्नासोबतच आत्मविश्वास आणि व्यावसायिक अनुभव मिळण्यास मदत होत असल्याचे अनिर्वेदशक्ती फाऊंडेशनच्या संस्थापक डॉ. आर. विमला (सेवानिवृत्त भा.प्र.से.) यांनी सांगितले. त्यांनी 'आयपीएसओडब्ल्यूए

# शेरणखेलच्या ९० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सहकार्याबद्दल ग्रामस्थांकडून आभार!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस सन्माननीय डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सहकार्यातून शेरणखेल येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या ९० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र पर्वावर दि. १५ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांना वह्या, पेन तसेच खाऊ देण्यात आला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, त्यांना शिक्षणासाठी नव्या उमेदीने प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन करण्यात आलेली ही मदत केवळ साहित्य वाटप नसून



त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिलेले प्रेरणादायी योगदान असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या उपक्रमाबद्दल समस्त ग्रामस्थ शेरणखेल, शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांच्या वतीने सन्माननीय डॉ. विश्वासराव आरोटे यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी असेच सहकार्य व मार्गदर्शन मिळावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# पारनेर शहरात 'हर घर तिरंगा' व 'स्वच्छता पंधरवडा' निमित्त भव्य रॅली; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना (NCC) आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर शहरामध्ये हर घर तिरंगा आणि स्वच्छता पंधरवडा २०२६ चे औचित्य साधून भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भारत माता की जय आणि स्वच्छता हीच ईश्वरसेवा अशा स्वच्छताविषयक घोषणांनी पारनेर शहराचा संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या उपक्रमात विद्यार्थ्यांसोबतच स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रॅलीदरम्यान रा.से.यो. स्वयंसेवक आणि एनसीसीच्या कॅडेट्सनी हातात विविध संदेश देणारे फलक धरून नागरिकांना तिरंग्याचा सन्मान, देशभक्ती आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी देशप्रेम आणि देशसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, 'हर घर तिरंगा' उपक्रम प्रत्येक नागरिकाच्या मनात राष्ट्र अभिमान जागवणारा आहे. त्याचप्रमाणे 'स्वच्छता पंधरवडा २०२६' च्या संदर्भात बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, स्वच्छता ही केवळ १५ दिवसांच्या उपक्रमापुरती मर्यादित न राहता ती आपल्या आणि आपल्या आसपासच्या सर्व नागरिकांच्या सवयीचा भाग झाली पाहिजे. तरच आपले व समाजाचे आरोग्य अबाधित राहील. स्वच्छता हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्याशिवाय महात्मा गांधीजी, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण होणार नाही. यासाठी सर्वांनी मिळून प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत.

स्वच्छता पंधरवड्यांतर्गत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष श्रमदानातून स्वच्छतेचा संदेश दिला. रा.से.यो. स्वयंसेवकांनी पारनेर मध्यवर्ती बसस्थानक परिसर आणि महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. याशिवाय, स्वयंसेवकांनी पारनेर शहरातील रहिवासी भागात दारोदार जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधला आणि परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत प्रभावी जनजागृती केली.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. हरेश शेळके, लेफ्टनंट भरत डगळे, कार्यालयीन अधीक्षक श्री. बाळासाहेब गिरी, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश गावित, प्रा. नितीन निपुंगे, डॉ. माया लहारे यांच्यासह विविध विभागांतील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जमादारवाडी येथे आजपासून भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह

## ज्ञानेश्वरी पारायणासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन; २८ ऑगस्टला काल्याच्या कीर्तनाने सांगता

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील मौजे जमादारवाडी येथे अध्यात्मिक क्षेत्रातील गौरवशाली परंपरेचे उपासक वैराग्याचे महामेरू संत सद्गुरू वामनभाऊ महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत ह. भ. प. रघुनाथ महाराज धामणगावकर व वारकरी भुषण कैलास महाराज भोरे यांच्या आशीर्वादाने भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट ते शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. या सोहळ्यानिमित्त दररोज सकाळी काकडा भजन दुपारी गाथा भजन रामकृष्णहरी जप हरिपाठ, त्यानंतर विविध संत–महंतांच्या कीर्तनसेवेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्ञानेश्वरी व्यासपीठ चालक ह.भ.प. दत्ता महाराज आजबे (आळंदी देवाची) यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वरी पारायण सोहळा होणार आहे.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी ह.भ.प. रामदास (दादा) महाराज आजबे, जमादारवाडी, त्यानंतर ह.भ.प. यशवंत महाराज कदम (आळेगाव), ह.भ.प. दत्ता महाराज आजबे (आळंदी), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज नगरे (पंढरपूर), ह.भ.प. शिवशाहीर अशोक महाराज आजबे (बीड), ह.भ.प. सुनील महाराज झांबरे (हिंगणी) तसेच ह.भ.प. रामकृष्ण महाराज रंधवे (पाटोदा) यांची कीर्तनसेवा होणार आहे.

# भाजपा प्रदेश महामंत्री सुनील राणे यांचा कोपरगांव मंडलातील टाकळी येथे 'शेतकरी संवाद'

## भाजपा प्रदेश महामंत्री सुनील राणे आ.विवेक कोल्हेंसमवेत चर्चेसाठी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव मंडलातील टाकळी येथे भाजपा प्रदेश महामंत्री मा.आ. सुनील राणे यांनी आमदार विवेक कोल्हे यांच्या समवेत शेतकरी संवाद उपक्रमातून उपस्थित शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.पीक कर्ज, पीक विमा, हमीभाव, पाटपाणी, सिंचन, पाणी व्यवस्थापन, शेतीमालाची बाजारपेठ आणि शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत शेतकऱ्यांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या.प्रदेश महामंत्री थेट शेतकरी संवादासाठी आल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण होते.

यावेळी सुनील राणे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत शेतीसमोरील प्रश्न केवळ ऐकून न घेता त्यामागील कारणे, शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. पीक विमा, शेतीमालाला योग्य बाजारभाव, सिंचन व्यवस्था आणि उत्पादन खर्च याबाबत शेतकऱ्यांच्या सूचना जाणून घेत संबंधित प्रश्न शासनाच्या पातळीवर मांडण्याबद्दल मार्गदर्शन केले.

आ. विवेक कोल्हे यांनी कोपरगाव तालुक्यातील पाटपाण्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधत उपलब्ध पाण्याचे प्रभावी नियोजन करून शेतकऱ्यांना नियमित व पुरेसे पाणी मिळणे गरजेचे असल्याचे सांगितले. वाढता उत्पादन खर्च आणि त्याप्रमाणात न मिळणारा शेतमालाचा दर ही शेतकऱ्यांसमोरील गंभीर समस्या असल्याचे त्यांनी नमूद केले.पीक विम्याबाबत आ. कोल्हे म्हणाले की, शेतकरी दरवर्षी मोठ्या प्रमाणात विमा हप्ता भरत असतानाही नुकसान झाल्यानंतर जाचक अटी व किचकट प्रक्रियेमुळे भरपाई मिळण्यात अडचणी येतात. त्यामुळे पीक विमा योजना अधिक पारदर्शक, सुलभ आणि शेतकरीपूरक करण्याची गरज आहे.

कोपरगावला समृद्धी महामार्ग, विमानतळ व रेल्वे मालवाहतुकीच्या सुविधा जवळ उपलब्ध असल्याने या भौगोलिक अनुकूलतेचा शेती विकासासाठी उपयोग करता येईल. तालुक्यात आधुनिक शीतगृहे, स्टोरेज व साठवणूक केंद्रे उभारल्यास शेतकऱ्यांना माल साठवून योग्य वेळी योग्य दरात विकता येईल आणि नासाडी कमी होऊन उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असेही आ. कोल्हे यांनी सांगितले.

यावेळी शेतकऱ्यांनी विविध प्रश्न व सूचना मांडल्या. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचविणारा शेतकरी संवाद उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.यावेळी जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर,अशोक पवार,सरपंच संदीप देवकर, शरदनाना थोरात,माजी सभापती सुनील देवकर,मंडलाध्यक्ष सुनील कदम, दिपक चौधरी,संचालक निलेश देवकर, रमेश घोडेराव, अंबादास देवकर, अंबादास कारभारी देवकर, राजेंद्र निवृत्ती देवकर, अनुराग येवले,पी. टी. देवकर, ज्ञानदेव राहणे , टी. वी. देवकर, दादासाहेब पाईक, बद्रीनाथ सांगळे, प्रवीण सांगळे, विनोद सांगळे, अनिल सांगळे, रमाकांत वाकचौरे, संपत वहाडने, शांताराम बनकर, अशोक बनकर, संजय



वाबळे, किरण सुराळकर, निलेश वराडे, कैलास जाधव, मनेश देवकर, गणेश थोरात, अल्लाउद्दीन शेख, सादिकभाई शेख,चेतन कोते,संजय देवकर, गणेश देवकर, सूर्यभान देवकर, शरद आहेर, स्वप्निल देवकर, वामनराव जाधव, विजय देवकर, बाळासाहेब देवकर, शांताराम बनकर, निलेश देवकर, संदीप आसने, दादापाटील आसने,धोंडिबा सांगळे यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.